

आपला
स्वातंत्र्यलढा
(इतिहास आणि नागरिकशास्त्र)
इयत्ता पाचवी


आपला
स्वातंत्र्यलढा

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक :
प्राशिसं/२००६-०७/मंजुरी ५०५(३०) दि.७-३-२००६

# आपला स्वातंत्र्यलढा

## (इतिहास आणि नागरिकशास्त्र)

## इयत्ता पाचवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २००६
पुनर्मुद्रण : जुलै : २०१०

संपादक मंडळ
बापूसाहेब शिंदे
आबासाहेब शिंदे
सुभाष तोडकर
लक्ष्मण भोये
श्रीकांत थावरे
प्रभाकर जाधव, समन्वयक

लेखक
डॉ. दत्तात्रय वाघ
प्रा. साधना कुलकर्णी

संयोजन
मोगल जाधव
विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

मुखपृष्ठ व सजावट
चंद्रशेखर बेगमपुरे

नकाशाकार
रविकिरण जाधव

निर्मिती
राजेंद्र विसपुते,
निर्मिती अधिकारी
प्रभाकर परब,
निर्मिती सहायक

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

अक्षरजुळणी
मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

कागद
७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

मुद्रणादेश
N/TECH - 2011-12
1,00,000

मुद्रक
Swastik Offset, A.nagar

प्रकाशक
श्री. विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई -२५

# भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## प्रस्तावना

'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा-२०००' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २००४' तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू होत आहे. अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय इयत्ता तिसरीपासून सुरू करण्यात आले आहेत.

शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचे इयत्ता पाचवीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयं-अध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'किमान क्षमता' प्राप्त कराव्यात, शिक्षणाची प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. 'स्वयं-अध्ययन' सुलभ व्हावे म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत. पाठ्यपुस्तकात काही पाठांच्या खाली चौकटीत विषयाशी संबंधित पूरक माहिती दिलेली आहे. त्या माहितीवर प्रश्न विचारणे अपेक्षित नाही.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

**पुणे** **(डॉ. वसंत काळपांडे)**

**दिनांक :** ५ जानेवारी, २००६ **संचालक**

१५ पौष, शके १९२७ महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४.

# अनुक्रमणिका


| | इतिहास | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारताची सांस्कृतिक विविधता | .... | १ |
| २. | विज्ञान आणि मानवी जीवन | .... | ७ |
| ३. | युरोपातील प्रबोधनाचे युग | .... | १२ |
| ४. | क्रांतियुग | .... | १६ |
| ५. | इंग्रजांचे भारतात आगमन व सत्तास्थापना | .... | २१ |
| ६. | १८५७ चा राष्ट्रीय उठाव | .... | २५ |
| ७. | इंग्रज राजवटीचे परिणाम | .... | ३० |
| ८. | नवे विचार : नवी दृष्टी | .... | ३३ |
| ९. | राष्ट्रीय सभेची स्थापना | .... | ४० |
| १०. | राष्ट्रीय चळवळीची वाटचाल | .... | ४४ |
| ११. | असहकार चळवळ | .... | ४७ |
| १२. | सविनय कायदेभंग | .... | ५३ |
| १३. | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | .... | ५७ |
| १४. | 'चले जाव' आंदोलन | .... | ६४ |
| १५. | आझाद हिंद सेना | .... | ६९ |
| १६. | भारत स्वतंत्र झाला | .... | ७४ |
| | **नागरिकशास्त्र** | | |
| १७. | आपला देश | .... | ८१ |
| १८. | आपली लोकशाही | .... | ८६ |
| १९. | आपले संविधान | .... | ९१ |
| २०. | आपला राज्यकारभार | .... | ९४ |
| २१. | आपली कर्तव्ये | .... | ९९ |

# १. भारताची सांस्कृतिक विविधता

भारताला हजारो वर्षांचा इतिहास आहे. इतका प्रदीर्घ इतिहास आणि इतकी प्राचीन संस्कृती असलेले फारच थोडे देश जगामध्ये आहेत. अश्मयुगापासून भारतात लोक राहत आले आहेत. भारताबाहेरील निरनिराळ्या प्रदेशांतून लोक भारतात आले. ते येथील संस्कृतीशी एकरूप झाले. यातून एक संमिश्र भारतीय संस्कृती आकारास आली आहे.

देशाच्या वेगवेगळ्या भागांत राहणारे आपण सारे भारतीय आहोत. भाषा, साहित्य, कला इत्यादींत विविधता असली, तरी भारतीय म्हणून आपण एक आहोत. ही विविधता भारतीयांमध्ये ऐक्यभावना निर्माण करण्यास पोषक ठरली आहे. आपले सामाजिक जीवन विविधतेमुळे समृद्ध झाले आहे.

**भारतातील भाषा :** भारतात अनेक भाषा बोलल्या जातात. हिंदी आणि इंग्रजी या भाषांचा वापर आपल्या देशात केला जातो. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे.


**सण-उत्सव :** भारतामध्ये हिंदू, मुसलमान, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, पारशी, यहुदी या धर्मांचे लोक राहतात. देशात विविध सण-उत्सव साजरे केले जात त. शेती हा आपल्या देशातील मुख्य व्यवसाय आहे. आपले अनेक उत्सव शेती आणि पर्यावरणाशी संबंधित आहेत. महाराष्ट्रात दसरा, दिवाळी, होळी; पंजाबात वैशाखी, आंध्रप्रदेशात एरूवाक पुन्नम, तमिळनाडूत पोंगल, तर केरळमध्ये ओणम हे उत्सव साजरे केले जातात. रमजान ईद, नाताळ, बुद्धपौर्णिमा, संवत्सरी, पटेटी हे महत्त्वाचे सण आहेत.

सण आणि उत्सव कोणत्याही धर्माचे असोत, सर्व भारतीय त्यांत आनंदाने सहभागी होतात. एकमेकांना शुभेच्छा देतात. त्यांच्यात एकोप्याची भावना वाढते.

**वेशभूषा आणि आहार :** भारतीयांच्या वेशभूषेत आणि आहारात विविधता आढळते. वेशभूषा ही त्या त्या भागातील निसर्ग, हवामान आणि परंपरा यांवर अवलंबून असते. भारतातील लोकांच्या आहारातही विविधता आढळते. ही विविधता हवामान, पिके अशा भौगोलिक फरकांमुळे झालेली आहे. उदाहरणार्थ, पंजाबी लोकांच्या आहारात प्रामुख्याने दाल-रोटी असते. किनारपट्टीवरील लोक भात-मासे खातात.

**निवारा :** घरे बांधण्याच्या पद्धतींतही भारतात विविधता आढळते. ग्रामीण भागांत अनेक घरांना कुडाच्या भिंती असतात. काही घरे कौलारू असतात. जास्त पावसाच्या प्रदेशातील घरे उतरत्या छपराची असतात. जेथे पाऊस कमी पडतो, तेथे धाब्याची घरे असतात. मोठ्या शहरांमध्ये अनेक मजली इमारती दिसून येतात.

**खेळ :** प्राचीन काळापासून भारतात अनेक प्रकारचे खेळ खेळले जातात. विटी-दांडू, बुद्धिबळ, कुस्ती, झिम्मा, फुगडी, मल्लखांब, लगोरी, आट्यापाट्या, खोखो, कबड्डी असे कितीतरी खेळ आपण खेळतो. हॉकी, क्रिकेट इत्यादी आधुनिक खेळही आपल्याकडे लोकप्रिय




**कबड्डी**

झाले आहेत. आपल्या जीवनात खेळाला फार महत्त्वाचे स्थान आहे. खेळांमुळे सहकार्य, एकजूट हे गुण आपल्या अंगी बाणतात. खेळात हार-जीत यापेक्षा जिद्द आणि जोश या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**कला :** भारतात संगीत, नृत्य, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला अशा अनेक कला विकसित झाल्या आहेत.

फार पूर्वीपासून आपल्या देशात विविध प्रकारचे संगीत प्रचलित आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या 'हिंदुस्थानी संगीत' आणि 'कर्नाटकी संगीत' अशा दोन प्रमुख पद्धती आहेत. याशिवाय भजन, कव्वाली, लावणी, पोवाडा यांसारखे लोकसंगीताचे अनेक प्रकार आहेत.

भारतात नृत्याची परंपराही फार जुनी आहे. अनेक प्रकारची लोकनृत्ये आहेत. संथाळ, नागा, मिझो या लोकांची नृत्ये विशेष आकर्षक असतात. महाराष्ट्रात कोळीनृत्य प्रसिद्ध आहे. पंजाबमधील भांगडा, राजस्थानातील



नागा नृत्य

घुमर, आसामातील बिहू, गुजरातमधील गरबा, कर्नाटकातील यक्षगान, केरळमधील कैलकोट्टीकळी हे भारतीय लोकनृत्याचे काही प्रकार आहेत.

भरतनाट्यम, कथ्थक, कथाकली इत्यादी शास्त्रीय नृत्यप्रकार विशेष प्रसिद्ध आहेत.

आपल्या देशात फार प्राचीन काळापासून वेगवेगळ्या प्रकारच्या हस्तकला विकसित झाल्या आहेत. मातीची नक्षीदार भांडी, वेताच्या व बांबूच्या टोपल्या, परड्या, फुलदाण्या अशा विविध वस्तू आजही सर्वत्र तयार केल्या जातात. भारतात विकसित झालेल्या हस्तकलेतून कारागिरांचे कौशल्य आणि सौंदर्यदृष्टी दिसून येते.

भारतातील चित्रकलेची परंपरा अश्मयुगातील गुहाचित्रांपासून सुरू होते. मध्यप्रदेशातील भीमबेटका येथील अश्मयुगातील गुहाचित्रे प्रसिद्ध आहेत. भारतीय चित्रकलेचे सुंदर नमुने अजिंठा येथील लेण्यांमध्ये आहेत. ही चित्रे सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी रंगवलेली आहेत. या चित्रांत वापरलेले रंग अद्यापही ताजे वाटतात. या चित्रांची कीर्ती जगभर पसरली आहे.

महाराष्ट्रातील वारली, बिहारमधील मधुबनी या आदिवासी चित्रशैली प्रसिद्ध आहेत.

**वास्तू :** भारतात अनेक ठिकाणी प्राचीन लेणी आढळतात. कार्ले, अजिंठा, वेरूळ येथील लेणी प्रसिद्ध आहेत. सांची येथील स्तूप प्रेक्षणीय आहे. कोणार्कचे सूर्यमंदिर, अबू येथील दिलवाडा मंदिरे, दिल्लीचा कुतुबमिनार, आग्रा येथील ताजमहाल वैशिष्ट्यपूर्ण आहेत. रायगड,



रायगड किल्ला

देवगिरी, ग्वालियर हे किल्ले भव्य आहेत. जंजिरा व सिंधुदुर्ग हे सागरी किल्ले प्रेक्षणीय आहेत. पंजाबमधील सुवर्णमंदिर हा स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे.

आपल्या देशाला समृद्ध ऐतिहासिक वारसा लाभला आहे. ऐतिहासिक वास्तू हे आपल्या देशाचे वैभव आहे. हा मौल्यवान ठेवा आपण जतन केला पाहिजे. अशा स्थळांना भेट देताना या वास्तूंची नासधूस होणार नाही, याची खबरदारी घ्यायला हवी. वास्तूंवर नावे कोरू नयेत, तसेच तेथील परिसराची हानी होणार नाही, याची काळजी आपण सर्वांनी घेतली पाहिजे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) भारतीय शास्त्रीय संगीताच्या हिंदुस्थानी संगीत आणि ............ संगीत अशा दोन प्रमुख पद्धती आहेत.

(आ) मध्यप्रदेशातील ............ येथील अश्मयुगातील गुहाचित्रे प्रसिद्ध आहेत.

(इ) महाराष्ट्रातील .......... व बिहारमधील मधुबनी या आदिवासी चित्रशैली प्रसिद्ध आहेत.

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) महाराष्ट्र | (१) भांगडा नृत्य |
| (आ) पंजाब | (२) कोळी नृत्य |
| (इ) राजस्थान | (३) कैलकोट्टीकळी नृत्य |
| (ई) केरळ | (४) घुमर नृत्य |
| | (५) गरबा नृत्य |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) वेशभूषेतील विविधता कोणत्या घटकांवर अवलंबून असते ?

(आ) खेळामध्ये कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असतात ?

(इ) भारतात लोकसंगीताचे कोणते प्रकार आहेत ?

४. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) घरे बांधण्याच्या पद्धतीत विविधता का आढळते ?

(आ) ऐतिहासिक स्थळांना भेटी देताना कोणती काळजी घ्यावी ?

५. **उपक्रम :**

शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध लोककला सादर करा.

❑❑❑

**संविधानात नमूद केलेल्या राजभाषा**

आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मल्याळम, मणिपुरी, मराठी, मैथिली, नेपाळी, उडिया, पंजाबी, संस्कृत, संथाळी, सिंधी, तमिळ, तेलुगु आणि उर्दू.



वेशभूषा

# २. विज्ञान आणि मानवी जीवन

भटके जीवन जगणारा अश्मयुगीन मानव आणि अवकाशात झेप घेणारा आजचा विज्ञानयुगातील मानव यांच्या जीवनात फार मोठा फरक पडला आहे.

सुरुवातीच्या हजारो वर्षांच्या काळात माणसाने काही महत्त्वाचे शोध लावले. हत्यारे बनवणे, अग्नी निर्माण करणे, चाकाचा उपयोग, शेती करण्याचे ज्ञान इत्यादींचा त्यांत समावेश होता. या प्रकारच्या ज्ञानामुळे माणसाचे दैनंदिन जीवन काहीसे सुखी बनले व स्थिर झाले. अलीकडच्या काळात, विशेषतः सोळाव्या शतकापासूनच्या पुढील चार शतकांत शरीरशास्त्र, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान अशा विज्ञानाच्या विविध शाखांत अनेक शोध लागले. या शोधांचा माणसाच्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उपयोग व्हावा, यासाठी यंत्रे व उपकरणे यांचे शोध लावण्यात आले. त्यामुळे माणसाचे जीवन अधिक सुखी झाले.


विसाव्या शतकात तर एकामागोमाग एक क्रांतिकारक शोध लागले.

राइट बंधूंनी विमानाचा शोध लावला. त्यामुळे माणूस आकाशातूनही प्रवास करू लागला. प्रवासाचा वेगही वाढला. अति वेगाने जाणारी विमाने माणसाने बनवली आहेत. विमानविद्येतील प्रगतीमुळे आज जगातील देश परस्परांशी हवाई मार्गाने जोडले गेले




राइट बंधू

आहेत. चांगल्याबरोबर वाईट कामासाठीही माणसाने या शोधाचा उपयोग करून घेतला. दुसऱ्या महायुद्धात शत्रूवर बाँब फेकण्यासाठी विमानांचा प्रथमच मोठ्या प्रमाणावर उपयोग केला गेला. त्यामुळे या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवित व संपत्तीचा नाश झाला.



**अणुशक्ती :** अणुशक्तीचा शोध लागल्यामुळे वीजनिर्मिती करणे शक्य झाले आहे. रोगनिदान, रोगोपचार, शेतीसंशोधन अशा विविध क्षेत्रांतही आज अणुशक्तीचा वापर केला जात आहे; परंतु अणुशक्तीचा विध्वंसक वापरही केला गेला. अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी जपानविरुद्ध अणुबाँब वापरले. त्यात हजारो लोक मृत्यू पावले आणि काही कायमचे जायबंदी झाले.

**अवकाश संशोधन :** अग्निबाणांचा (रॉकेट्स) शोध लागल्याने अवकाश संशोधनाच्या कार्याला प्रोत्साहन मिळाले. अग्निबाणांच्या साहाय्याने कृत्रिम उपग्रह अवकाशात पाठवणे शक्य झाले. उपग्रहांच्या मदतीने हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणे, पृथ्वीवरील वनक्षेत्राचे मापन करणे, नैसर्गिक




अग्निबाण

संकटांची आगाऊ सूचना देणे, जगभरातील देशांमध्ये परस्परांत दूरध्वनी व दूरदर्शन संपर्क प्रस्थापित करणे इत्यादी प्रकारच्या सुविधा आपल्याला प्राप्त झाल्या आहेत. अग्निबाणातून अवकाशात पाठवलेल्या कृत्रिम उपग्रहांमुळे व अवकाशयानांमुळे ग्रह व उपग्रहांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे.

**माहिती तंत्रज्ञान :** संगणकाचा शोध हा विसाव्या शतकातील एक महान शोध आहे. मानवी जीवनात त्यामुळे क्रांती घडून आली आहे. वैद्यकीय निदान करणे, कार्यालयातील कामे अचूक व कार्यक्षमतेने करणे, शास्त्रीय संशोधन करणे, प्रवासी तिकिटांचे आरक्षण करणे, सरकारी व अन्य दस्तऐवज जपून ठेवणे, कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे अशा प्रकारची कामे करणे संगणक तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. अलीकडे विकसित झालेल्या 'इंटरनेट'च्या तंत्रज्ञानामुळे माहितीची देवाणघेवाण करणे अत्यंत सोईचे झाले आहे. विविध विषयांशी संबंधित संकेतस्थळे (वेबसाइट्स) संगणकावर उपलब्ध झाल्याने विविध विषयांची अद्ययावत माहिती मिळवणे शक्य झाले आहे. इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या विषयाची माहिती हवी असेल, तर संगणकावर योग्य त्या संकेतस्थळाला भेट देऊन ती माहिती मिळवता येते.

वर वर्णन केलेल्या शोधांखेरीज क्ष-किरण तंत्रज्ञान, यंत्रमानव, ट्रॅक्टरसारखी अवजड वाहने, जनुकीय संशोधन, उत्तमोत्तम शेतकी बियाणांचा विकास, अत्याधुनिक दूरध्वनी व भ्रमणध्वनी (मोबाइल) तंत्रज्ञान अशा अनेक प्रकारचे शोध लागल्याने माणसाला प्रगतीचे व विकासाचे मार्ग खुले झाले आहेत.

या सर्व सुविधांचा डोळसपणे व संयमाने वापर करायला हवा. अन्यथा आपल्यासमोर अनेक समस्या उभ्या राहू शकतात. प्रदूषण, हिंसाचार व



प्रदूषण

दहशतवाद, गुन्हेगारीची वाढ, मानवी हक्कांचे उल्लंघन या त्यांपैकी काही समस्या आहेत.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) राइट बंधूंनी ............ शोध लावला.

(आ) अणुशक्तीचा शोध लागल्यामुळे ............ करणे शक्य झाले आहे.

(इ) संगणकाचा शोध हा ............ शतकातील महान शोध आहे.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सुरुवातीच्या काळात माणसाने कोणते शोध लावले ?

(आ) अणुशक्तीचा वापर आज कोणकोणत्या क्षेत्रांत केला जात आहे ?

(इ) इंटरनेटच्या तंत्रज्ञानामुळे कोणती गोष्ट सोईची झाली आहे ?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) उपग्रहामुळे आपल्याला कोणत्या सुविधा प्राप्त झाल्या ?

(आ) संगणक तंत्रज्ञानामुळे कोणती कामे करणे शक्य झाले ?

४. **उपक्रम :**

'विज्ञान-शाप की वरदान' या विषयावर शिक्षकांच्या मार्गदर्शनाने वर्गात चर्चा आयोजित करा.



**राइट बंधूंनी तयार केलेले विमान**

# ३. युरोपातील प्रबोधनाचे युग

आज युरोप खंड अनेक क्षेत्रांत आघाडीवर आहे, पण मध्ययुगीन युरोपातील समाज मागासलेल्या अवस्थेत होता. समाजावर धर्मगुरूंचा प्रभाव होता. ते जे सांगतील ते लोकांना मान्य करावे लागे. धर्मगुरूंची प्रवचने हे लोकांचे ज्ञान मिळवण्याचे प्रमुख साधन होते. धर्मगुरूंप्रमाणे राजघराण्यातील लोक व सरदार, उमराव यांनाही समाजात महत्त्व असे.

**प्रबोधन :** युरोपातील ही स्थिती हळूहळू बदलू लागली, कारण युरोपात पुढील काळात वैचारिक जागृती घडून आली. धर्मगुरू, सरदार, उमराव यांच्याइतकेच सामान्य माणसाच्या भावभावनांनाही महत्त्व आहे, तसेच प्रत्येक माणसाला एक व्यक्ती म्हणून मूल्य आहे ही जाणीव झाली. बुद्धीला पटेल तेच मान्य करावे, हा विचार लोकांना समजला. या वैचारिक जागृतीला प्रबोधन असे म्हणतात.

विविध कारणांमुळे युरोपात प्रबोधन घडून आले.

**छपाई यंत्राचा शोध :** इ. स. १४५० च्या सुमारास छपाई यंत्राचा शोध लागला. तोपर्यंत हस्तलिखित पुस्तकेच होती. ती सर्वांना वाचायला मिळणे शक्य नव्हते. शिवाय ती लॅटिन किंवा ग्रीक भाषेत असत. सर्वसामान्य लोकांना या भाषा समजत नसत. छापण्याच्या कलेमुळे लोकांच्या भाषेत लिहिलेली पुस्तके अनेक लोकांना वाचता येण्याची सोय झाली.



रॉजर बेकन

**नवे साहित्य-नवे विचार :** 'स्वतःच्या बुद्धीवर विश्वास ठेवा, केवळ इतर कोणी सांगतो म्हणून त्यावर विसंबून राहू नका,' असे रॉजर बेकनने

सांगितले. इटालियन कवी डान्टे याने 'डिव्हाइन कॉमेडी' हा काव्यग्रंथ लिहिला. या काव्यग्रंथात माणसाच्या भावनांचे वर्णन केले आहे. शेक्सपियर या इंग्रजी लेखकाने माणसाच्या मनातील राग, लोभ, प्रेम या भावनांवर आधारित कथा आपल्या नाटकांतून रंगवल्या आहेत.

**कला क्षेत्रातील बदल :** चित्रकला, मूर्तिकला या क्षेत्रांतही नव्या प्रकारच्या विषयांचे चित्रण केले गेले. लिओनार्डो-द-व्हिन्सी याने 'मोनालिसा' या चित्रात एका तरुणीच्या चेहऱ्यावरील हास्याचे अप्रतिम चित्रण केले आहे. यापूर्वीच्या काळात सामान्य माणूस चित्रकलेचा विषयच होऊ शकत नव्हता, फक्त धर्मकथांवर आधारलेलीच चित्रे काढली जात.


मोनालिसा

**विज्ञानातील प्रगती :** कोपर्निकस, गॅलिलिओ, हॅले यांसारख्या खगोलशास्त्रज्ञांच्या शोधांमुळे ग्रहमालेबद्दल अधिक माहिती उपलब्ध झाली. सूर्य पृथ्वीभोवती फिरतो, ग्रहणे आणि धूमकेतू हे आपल्यावर संकटे आणतात इत्यादी समज पूर्णपणे खोटे आहेत, हे माणसाला समजले. प्रयोगशीलतेवर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोनामुळे खगोलशास्त्राप्रमाणेच पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादी विषयांतही अनेक नवे शोध लागण्यास सुरुवात झाली.

**भौगोलिक शोध :** लांबचा प्रवास करू शकतील अशी जहाजे तयार करण्याचे ज्ञान प्रबोधन युगात प्राप्त झाले. अचूक नकाशे बनवण्याचे शास्त्रही अवगत झाले. होकायंत्राची माहिती झाली. या प्रगतीमुळे नवे भूप्रदेश शोधण्याच्या चळवळीला युरोपात चालना मिळाली.

आशियातून युरोपकडे जाण्याचा एकच व्यापारी मार्ग तोपर्यंत माहीत होता. हा खुष्कीचा मार्ग कॉन्स्टॅन्टिनोपल म्हणजे आताचे इस्तंबूल या शहरातून जात होता. खुष्कीचा मार्ग म्हणजे जमिनीवरून जाणारा मार्ग. इ. स. १४५३ मध्ये तुर्की लोकांनी हे शहर रोमन सम्राटाकडून जिंकून घेतले. त्यामुळे नवे मार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली. नौकानयन शास्त्रातील प्रगतीमुळे युरोपातील अनेक धाडसी खलाश्यांनी जगातील नवे प्रदेश शोधून काढण्याच्या मोहिमा हाती घेतल्या. कोलंबस, अमेरिगो व्हेस्पुसी, वास्को-द-गामा, फर्डिनंड मॅगेलन इत्यादी खलाश्यांचा त्यांत समावेश होतो. या मोहिमांमुळे अमेरिका खंडाचा शोध लागला. भारत व पूर्वेकडील अन्य देशांकडे जाण्याचे नवे सागरी मार्ग माहीत झाले.


मार्टिन ल्यूथर

**धर्मसुधारणा चळवळ :** प्रबोधनामुळे धर्मगुरूंच्या व पोपच्या अधिकारांना आव्हान मिळाले. हस, इरॅस्मस, मार्टिन ल्यूथर यांसारख्या विचारवंतांनी धर्मगुरूंच्या अन्यायकारक आज्ञा लोकांनी मानू नयेत, अशी शिकवण दिली. बायबल हा धर्मग्रंथ वाचून लोक स्वतःच धर्माज्ञांचा अर्थ लावू शकतात, त्यासाठी धर्मगुरूंची आवश्यकता नाही, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांचे वारे युरोपात वाहू लागले.

आधुनिक काळात युरोपात घडून आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय बदलांची सुरुवात प्रबोधन युगात झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) डान्टे याने इटालियन भाषेत लिहिलेल्या ............ या पुस्तकात माणसांच्या भावनांचे वर्णन केले आहे.

(आ) मोनालिसा या चित्रात एका तरुणीच्या चेहऱ्यावरील हास्याचे चित्रण ............ याने केले आहे.

(इ) कोपर्निकस, गॅलिलिओ, ............ यांसारख्या खगोलशास्त्रज्ञांच्या शोधांमुळे ग्रहमालेबद्दल अधिक माहिती उपलब्ध झाली.

(ई) धर्मगुरूंच्या व पोपच्या अधिकारांना ............ मुळे आव्हान मिळाले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) रॉजर बेकन याने कोणता विचार मांडला ?

(आ) नवे मार्ग शोधण्याची गरज का निर्माण झाली ?

(इ) हस, इरॅस्मस, मार्टिन ल्यूथर यांनी कोणती शिकवण दिली ?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) प्रबोधन म्हणजे काय ?

(आ) नवे भूप्रदेश शोधण्याच्या चळवळीला चालना का मिळाली ?

४. **उपक्रम :**

होकायंत्राची माहिती शिक्षकांच्या मदतीने मिळवा.

# ४. क्रांतियुग

समाजजीवनाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक अशा क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर आणि वेगाने जे बदल घडून येतात, अशा बदलांना क्रांती म्हणतात. हे बदल ज्या काळात होतात, त्या काळाला 'क्रांतियुग' असे म्हणतात. या अर्थाने अठरावे शतक हे क्रांतियुग होते. अठराव्या शतकात अमेरिकेमध्ये स्वातंत्र्ययुद्ध झाले. फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. या घटनांमुळे अमेरिका व युरोपमध्ये काही तात्कालिक बदल घडून आले. तसेच त्यापुढील काळात जगातील इतर देशांवरही त्याचे परिणाम झाले. या घटनांची आपण थोडक्यात माहिती करून घेऊ.

**अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध :** अमेरिगो व्हेस्पुसी याच्या सागरी मोहिमेमुळे अमेरिका खंडाचा शोध लागला. त्यानंतर युरोपमधील अनेक देशांतील लोकांनी या नव्या ठिकाणी जाऊन तेथील प्रदेश बळकावले. इंग्लंडमधील लोकांनी अमेरिकेमध्ये स्वतःच्या वसाहती स्थापन केल्या. शालेय शिक्षण देणे, सार्वजनिक वाचनालये सुरू करणे, स्थानिक कर ठरवणे व अन्य स्थानिक विषयांसंबंधीचे निर्णय घेण्याची वसाहतींना मुभा होती, पण जगातील इतर देशांशी संबंध ठेवण्यास त्यांना परवानगी नव्हती. या वसाहतींच्या व्यापारावरही इंग्लंडचे नियंत्रण होते. अमेरिकेतील नैसर्गिक साधन-संपत्तीचा इंग्लंडच्या फायद्यासाठी उपयोग करून घेणे, हाच यामागे मुख्य हेतू होता. शिवाय गरज भासेल तेव्हा वसाहतीतील लोकांकडून वेगवेगळ्या प्रकारचा कर वसूल करण्याचाही हक्क इंग्लंडला होता. फ्रान्स या देशाशी झालेल्या युद्धाच्या खर्चाचा काही हिस्सा अमेरिकन वसाहतींनी सोसावा, असा हुकूम जारी करण्यात आला.

इंग्लंडने वसाहतींवर लादलेली अशी बंधने अमेरिकन वसाहतींना मंजूर नव्हती. 'इंग्लंडच्या संसदेत आमचा प्रतिनिधी नसल्यामुळे आमच्यावर कर

लादण्याचा इंग्लंडला अधिकार नाही, आम्ही कर देणार नाही,' असे सांगून वसाहतींनी इंग्लंडच्या जुलमाविरूद्ध चळवळ सुरू केली.

४ जुलै १७७६ रोजी अमेरिकन वसाहतींनी आपल्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सर्व माणसे जन्मतः समान आहेत, प्रत्येकाला जगण्याचा, स्वातंत्र्याचा आणि सुखाचा उपभोग घेण्याचा हक्क आहे, जनता सार्वभौम आहे, असे विचार जाहीरनाम्यात मांडण्यात आले. हा स्वातंत्र्याचा जाहीरनामा थॉमस जेफरसन याने तयार केला.


जॉर्ज वॉशिंग्टन

अमेरिकन वसाहतींचा नेता जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली इंग्लंडशी युद्ध झाले. या युद्धात अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडचा पराभव केला. वसाहतींनी एकत्र येऊन आपले 'संघराज्य' स्थापन केले. जॉर्ज वॉशिंग्टनची पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. राजाविना राज्य चालू शकते, हा नवीन विचार अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाने दिला.


**फ्रेंच राज्यक्रांती :** इ. स. १७७४ मध्ये सोळावा लुई फ्रान्सचा राजा झाला. मनाला येईल त्याप्रमाणे तो राज्यकारभार करी. त्याच्या अगोदर होऊन गेलेल्या राजांनीही फ्रान्समध्ये दडपशाही पद्धतीने राज्यकारभार केला होता. लोकांना क्षुल्लक कारणांवरून तुरुंगात डांबले जाई. राजा व त्याचे सरदार चैन आणि ऐषाराम करत. सरदार, धर्मगुरू यांना करातून सूट मिळे. कराचा सर्व बोजा सामान्य लोकांवर पडत असे. राजाच्या विरोधात कट-कारस्थाने केल्याच्या संशयावरून अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला.

फ्रान्सची राजधानी पॅरिस येथील बॅस्टिलच्या तुरुंगात सर्वांना डांबण्यात येत असे.

सामान्य लोकांवर होत असलेल्या या अन्यायाविरुद्ध फ्रान्समधील अनेक विचारवंतांनी आवाज उठवला होता. त्यात माँटेस्क्यू, व्हॉल्टेअर, रूसो असे अनेकजण होते. त्यांच्या विचारांमुळे फ्रान्समधील सामान्य लोकांना राजाच्या जुलमाविरुद्ध चळवळ करण्याची प्रेरणा मिळाली. अन्यायाचे प्रतीक बनलेल्या बॅस्टिलच्या तुरुंगावर १४ जुलै १७८९ रोजी लोकांनी हल्ला केला. तुरुंगातील कैद्यांना मुक्त केले. पुढे लवकरच राजाच्या जुलमी कारभारातून फ्रान्सची मुक्तता झाली.

फ्रान्सच्या राज्यक्रांतीतून व्यक्त झालेली स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये आधुनिक जगाच्या उभारणीला साहाय्यभूत झाली आहेत.

**औद्योगिक क्रांती :** युरोपमधील देशांचा पूर्वेकडील देशांशी सुरू झालेला व्यापार अठराव्या शतकात भरभराटीला आला. व्यापारात इंग्लंडने इतर युरोपीय देशांच्या मानाने मोठी प्रगती केली होती. आपला व्यापार अजून वाढला पाहिजे, असे इंग्रज व्यापाऱ्यांना वाटले. याच सुमारास इंग्लंडमध्ये विविध प्रकारच्या यंत्रांचे शोध लागले. जॉन के याने धावत्या धोट्याचा शोध लावला. त्यामुळे कापड विणण्याचा वेग वाढला. आर्कराइटने सूतकताईचे यंत्र पाणचक्कीवर चालवण्याचा प्रयोग यशस्वी केला. कापड उद्योगामध्ये होणाऱ्या या यांत्रिक प्रगतीमुळे कापडाचे उत्पादन अनेक पटींनी वाढले. जेम्स वॅट याने वाफेच्या इंजिनाचा शोध लावला. स्टिफन्सन याने वाफेवर चालणारे रेल्वेचे इंजिन तयार केले. शेतीचे उत्पादन वाढवण्यास उपयोगी पडतील असे शोध लागले. अशा नवनव्या शोधांमुळे विविध उद्योग भरभराटीला आले. मोठमोठे कारखाने स्थापन होण्यास सुरुवात झाली व कारखानदारीला चालना मिळाली. त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. यालाच औद्योगिक क्रांती असे म्हणतात.



स्टिफन्सनने तयार केलेले रेल्वे इंजिन

युरोपातील उत्पादनवाढीमुळे युरोपीय देशांना बाजारपेठेची आवश्यकता वाटू लागली. त्यांनी आशिया, आफ्रिका खंडांत स्वतःच्या वसाहती स्थापन करण्यास सुरुवात केली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) अमेरिगो व्हेस्पुसी याच्या सागरी मोहिमेमुळे ............ खंडाचा शोध लागला.

(आ) ४ जुलै १७७६ रोजी अमेरिकन वसाहतींनी आपल्या ............ चा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

(इ) अन्यायाचे प्रतीक बनलेल्या ............ तुरुंगावर १४ जुलै १७८९ रोजी लोकांनी हल्ला केला.

(ई) अमेरिकेचा पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून ......... यांची निवड झाली.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) जॉन के | (१) वाफेचे इंजिन |
| (आ) आर्कराइट | (२) वाफेवर चालणारे रेल्वे इंजिन |
| (इ) स्टिफन्सन | (३) पाणचक्कीवर चालणारे सूतकताईचे यंत्र |
| (ई) जेम्स वॅट | (४) धावता धोटा |
| | (५) विजेवर चालणारे इंजिन |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाने कोणता नवा विचार दिला ?

(आ) फ्रान्समधील कोणत्या विचारवंतांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला ?

(इ) फ्रान्सच्या राज्यक्रांतीने कोणत्या मूल्यांची देणगी जगाला दिली ?


४. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडला कर देण्यास का विरोध केला ?

(आ) अमेरिकन वसाहतींनी स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात कोणते विचार मांडले ?

५. उपक्रम :

तुमच्या परिसरातील कारखान्याला भेट द्या. तेथील उत्पादन प्रक्रियेचे निरीक्षण करा.



प्रचलित हातमाग


# ५. इंग्रजांचे भारतात आगमन व सत्तास्थापना

इंग्रज हे युरोप खंडातील इंग्लंड या देशाचे रहिवासी. त्यांनी भारत देश कसा ताब्यात घेतला, याची माहिती आपण या पाठात करून घेणार आहोत.

**युरोपीय व्यापाऱ्यांचे भारतात आगमन :** भारत आणि युरोप यांच्यात प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. युरोपीय बाजारपेठेत भारताच्या मालाला मोठी मागणी होती. मध्ययुगात हा व्यापार प्रामुख्याने खुष्कीच्या मार्गाने चालत होता. नंतर युरोपातील व्यापारी व राजांनी भारताशी व्यापार करण्यासाठी भारताकडे जाणारा समुद्रमार्ग शोधण्यास सुरुवात केली.

पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा दक्षिण आफ्रिकेला वळसा घालून इ. स. १४९८ मध्ये भारतात कालिकत बंदरात पोहोचला. त्याने तेथील झामोरिन राजाकडून व्यापारी सवलती मिळवल्या. पोर्तुगिजांनी इ. स. १५१० मध्ये गोवा काबीज केला. त्यानंतर दीव-दमण आपल्या ताब्यात घेतले. भारताशी झालेल्या व्यापारात पोर्तुगिजांनी अमाप संपत्ती मिळवली. त्यामुळे पोर्तुगिजांच्या पाठोपाठ डच, इंग्रज, फ्रेंच व्यापारी भारतात आले.


वास्को-द-गामा




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1999.

**ईस्ट इंडिया कंपनी :** भारताशी व्यापार करण्याच्या हेतूने काही इंग्रज व्यापारी लंडन शहरात एकत्र आले आणि त्यांनी व्यापारी कंपनी स्थापन केली. तिला ईस्ट इंडिया कंपनी असे म्हणतात. या कंपनीला पूर्वेकडील देशांशी, विशेषतः भारताशी व्यापार करण्याची सनद इंग्लंडच्या राणीकडून इ. स. १६०० मध्ये मिळाली.

**सत्तेची पायाभरणी :** या वेळी भारतावर मुघलांचे साम्राज्य होते. ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १६०८ मध्ये जहांगीर या मुघल सम्राटाकडून भारतात व्यापार करण्याचा परवाना मिळवला. सुरत येथे कंपनीची वखार स्थापन केली.

वखारीमध्ये व्यापारी माल साठवला जात असे. यापुढील शंभर वर्षांत इंग्रजांनी भारताच्या किनारी प्रदेशात अनेक ठिकाणी वखारी स्थापन केल्या.

**बंगाल प्रांतात इंग्रजांचा शिरकाव :** मुघल सम्राटाने व्यापाराचा परवाना देताना इंग्रजांना काही सवलती दिल्या होत्या. बंगालमधील इंग्रज व्यापारी या सवलतींचा दुरुपयोग करू लागले. परवानगी न घेता इंग्रजांनी आपल्या वखारींभोवती तटबंदी करण्यास सुरुवात केली. त्यास बंगालचा नबाब सिराज उद्दौलाने हरकत घेतली. त्यामुळे इंग्रजांनी सिराज उद्दौलाच्या विरुद्ध युद्ध पुकारले. इ. स. १७५७ च्या प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी सिराज उद्दौलाचा पराभव केला.

इंग्रजांनी बंगाल प्रांतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले. येथील माल स्वस्त किमतीत मिळावा म्हणून ते लोकांवर अत्याचार करू लागले. इंग्रजांच्या या कारवायांना लगाम घालण्यासाठी बंगालचा तत्कालीन नबाब मीर कासीमने मुघल सम्राट शहाआलम व अयोध्येचा नबाब शुजा उद्दौला यांच्या सहकार्याने संयुक्त मोहीम काढली. या तिघांचा इंग्रजांनी इ. स. १७६४ मध्ये बक्सार येथे पराभव केला. इंग्रजांनी मुघल सम्राटाकडून बंगालच्या दिवाणीचा म्हणजे महसूल गोळा करण्याचा अधिकार मिळवला. अशा प्रकारे भारतातील इंग्रजी सत्तेचा बंगालमध्ये पाया घातला गेला.

**इंग्रजी साम्राज्याचा विस्तार :** या वेळी दिल्लीच्या मुघल सम्राटाची सत्ता खिळखिळी झाली होती. उत्तर भारतात शीख, राजपूत, जाट व रोहिले यांची स्वतंत्र राज्ये होती. तसेच दक्षिणेत मराठे, निजाम व इतरही राज्ये होती. त्यांच्यात आपापसात संघर्ष चालू होते. त्यामुळे भारतातील राज्यकर्ते दुबळे झाले. याचा फायदा इंग्रजांनी घेतला.

मराठे, टिपू सुलतान तसेच शीख यांनी इंग्रजांशी सामना केला. इंग्रजांशी लढताना टिपू सुलतान धारातीर्थी पडला. इंग्रजांचे मराठ्यांशी

युद्ध झाले. दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पराभव झाला व मराठी सत्ता इ. स. १८१८ मध्ये संपुष्टात आली. झाशी, सातारा, नागपूर, अयोध्या इत्यादी संस्थाने इंग्रजांनी खालसा केली. इंग्रजांनी पंजाबवर आक्रमण करून शिखांचा पराभव केला आणि पंजाबही ताब्यात घेतला. अशा प्रकारे इंग्रजांनी भारतात आपल्या सत्तेचा विस्तार केला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) प्राचीन काळापासून भारत आणि ············ यांच्यात व्यापारी संबंध होते.

(आ) पोर्तुगीज खलाशी ············ दक्षिण आफ्रिकेला वळसा घालून इ. स. १४९८ मध्ये भारतात कालिकत बंदरात पोहोचला.

(इ) पोर्तुगिजांनी इ. स. १५१० मध्ये ············ काबीज केला.

(ई) ईस्ट इंडिया कंपनीने इ. स. १६०८ मध्ये ············ या मुघल सम्राटाकडून भारतात व्यापार करण्याचा परवाना मिळवला.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) डच, इंग्रज, फ्रेंच व्यापारी भारतात का आले ?

(आ) इंग्रजांनी मुघल सम्राटाकडून कोणता अधिकार मिळवला ?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) इंग्रजांनी सिराज उद्दौलाच्या विरुद्ध युद्ध का पुकारले ?

(आ) भारतातील राज्यकर्ते दुबळे का झाले ?

# ६. १८५७ चा राष्ट्रीय उठाव

आधुनिक भारताच्या इतिहासातील १८५७ चा राष्ट्रीय उठाव ही एक महत्त्वाची घटना आहे. इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध जनता व सैनिक यांच्या मनात असंतोष होता. या असंतोषाचा उद्रेक म्हणजे १८५७ चा राष्ट्रीय उठाव होय.

**जनतेतील असंतोष :** दारिद्र्य आणि बेकारी यांमुळे देशातील लोक गांजून गेले होते. शेतकऱ्यांवरील कराचा बोजा वाढल्यामुळे शेतकरी असंतुष्ट होते. इंग्रजांनी काही राजेरजवाड्यांची संस्थाने म्हणजे त्यांची राज्ये खालसा केली. काहींचे तनखे बंद केले. संस्थाने खालसा केल्यामुळे सैनिक, कारागीर इत्यादी बेकार झाले.

इंग्रजांनी भारतात काही सामाजिक सुधारणा केल्या. सतीची चाल बंद केली. विधवा विवाहास मान्यता दिली. असे कायदे करून इंग्रज सरकार आपल्या धर्मात हस्तक्षेप करत आहे, असे लोकांना वाटू लागले.

**सैनिकांतील असंतोष :** इंग्रजांच्या लष्करातील भारतीय सैनिकांना भेदभावाची वागणूक मिळत होती. त्यांना इंग्रज सैनिकांपेक्षा कमी पगार मिळे. बढतीही नाकारली जात असे. लढण्यासाठी भारताबाहेर जाण्याची त्यांच्यावर सक्ती केली जात असे. इंग्रज अधिकारी त्यांची मानहानी करत. सैनिकांनी कपाळाला गंध लावू नये, दाढीमिश्या ठेवू नयेत असे नियम करण्यात आले होते. अशा नियमांमुळे सैनिकांत असंतोष पसरला होता. नव्या प्रकारच्या बंदुका सैनिकांना देण्यात आल्या. या बंदुकांत वापरायची काडतुसे ज्या आवरणात गुंडाळलेली असत, ती आवरणे सैनिकांना दातांनी तोडावी लागत. या आवरणांना गाय व डुक्कर यांची चरबी लावलेली

आहे. या बातमीमुळे भारतीय सैनिकांच्या भावना दुखावल्या. अशा अनेक कारणांमुळे सर्वत्र असंतोष धुमसत होता.

**उठावाचा भडका :** बंगाल प्रांतातील बराकपूर येथील लष्करी छावणीत २९ मार्च १८५७ रोजी मंगल पांडे या सैनिकाने इंग्रज अधिकाऱ्यावर गोळी झाडली. पुढे त्यांना फाशी देण्यात आले. यामुळे उठावाचा भडका उडाला.

**उठावाची वाटचाल :** मंगल पांडे यांच्या हौतात्म्याने भारतीय शिपायांना लढण्याची प्रेरणा मिळाली. मेरठ छावणीतील संपूर्ण भारतीय पलटणच १० मे १८५७ रोजी बंड करून उठली. त्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांचे हुकूम उघडपणे झिडकारले. मुघल बादशाहा बहादुरशहा यांना इंग्रजांच्या ताब्यातून सोडवण्यासाठी सैनिक दिल्लीकडे निघाले. दिल्लीस जात असताना वाटेत त्यांना ठिकठिकाणच्या लष्करी छावण्यांतले सैनिक सामील झाले. त्यांनी दिल्ली काबीज केली. भारताचा बादशाहा म्हणून बहादुरशहा यांना गादीवर बसवले.

यानंतर सशस्त्र उठावाचा वणवा उत्तर भारतात अन्य ठिकाणी पसरला. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, अयोध्येची बेगम हजरतमहल, बिहारमधील जमीनदार कुंवरसिंह, मौलवी अहमदउल्ला यांनी आपापल्या प्रदेशात उठावाचे नेतृत्व केले.


बहादुरशहा


राणी लक्ष्मीबाई


नानासाहेब पेशवे



कुंवरसिंह



बेगम हजरतमहल




तात्या टोपे

दक्षिण भारतातही उठाव झाले. कजारसिंग यांच्या नेतृत्वाखाली खानदेशात भिल्लांनी मोठा उठाव केला. औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, नागपूर इत्यादी ठिकाणी उठाव झाले. १८५७ च्या उठावात हिंदू, मुसलमान एकजुटीने लढले. सामान्य जनता, जहागीरदार यांनी उठावाला साथ दिली.

**उठावाचा शेवट :** उठावातील नेत्यांपैकी कुंवरसिंह, मौलवी अहमदउल्ला आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई हे धारातीर्थी पडले. मुघल बादशाहा बहादुरशहा यांना इंग्रजांनी तुरुंगात टाकले. नानासाहेब पेशवे आणि बेगम हजरतमहल यांनी नेपाळमध्ये आश्रय घेतला. तात्या टोपे इंग्रजांच्या हाती सापडले. त्यांना फाशी देण्यात आले.

हा उठाव जवळजवळ वर्षभर चालू होता. भारतीय सैन्य शौर्य, धैर्य यांत कमी नव्हते. तरीही या उठावात त्यांना अपयश आले. याचे कारण इंग्रजांनी या उठावास अत्यंत योजनाबद्ध रीतीने व खंबीरपणे तोंड दिले. इंग्रजांच्या सैन्यातील शिस्त उत्तम होती. लष्करी हालचालींत एकसूत्रता होती. इंग्रजांकडे दळणवळणाची आधुनिक साधने व शस्त्रे होती.

**उठावाचे परिणाम :** १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील सत्तेचा शेवट झाला. इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने भारताचा कारभार आपल्या हाती घेतला. तिने भारतीयांना उद्देशून एक जाहीरनामा




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright. 1999.

काढला. भारतीयांच्या रूढी, चालीरीती आणि धर्म यांत इंग्रज हस्तक्षेप करणार नाहीत, तसेच संस्थानिकांची राज्ये खालसा केली जाणार नाहीत, असे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आले.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) संस्थाने खालसा केल्यामुळे सैनिक, .......... इत्यादी बेकार झाले.

(आ) खानदेशात भिल्लांनी ............ यांच्या नेतृत्वाखाली मोठा उठाव केला.

(इ) भारताचा बादशाहा म्हणून ............ यांना गादीवर बसवले.

(ई) उठावातील नेत्यांपैकी कुंवरसिंह, मौलवी अहमदउल्ला आणि ............ हे धारातीर्थी पडले.

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) इंग्रजांनी भारतात कोणत्या सामाजिक सुधारणा केल्या ?

(आ) भारतीय सैनिक दिल्लीकडे का निघाले ?

(इ) राणीच्या जाहीरनाम्याने संस्थानिकांना कोणते आश्वासन दिले ?

३. कारणे द्या.

(अ) भारतीय सैनिकांच्या भावना दुखावल्या.

(आ) १८५७ च्या राष्ट्रीय उठावात भारतीयांना अपयश आले.

४. उपक्रम :

१८५७ च्या राष्ट्रीय उठावातील नेत्यांची चित्रे मिळवा व त्यांचा संग्रह करा.

# ७. इंग्रज राजवटीचे परिणाम

इंग्रजांच्या आगमनापूर्वी एक अतिशय संपन्न देश अशी भारताची प्रसिद्धी होती. कापड उद्योग, हस्तकला व्यवसाय व अन्य व्यापारी वस्तूंचे उत्पादन यांत भारतीय आघाडीवर होते. भारताचा व्यापार जगभर चालत होता, पण इंग्रजांच्या आर्थिक व व्यापारी धोरणांमुळे भारतातील संपत्तीचा ओघ आता इंग्लंडकडे जाऊ लागला. त्यातून भारताची पिळवणूक सुरू झाली.

भारतात बहुसंख्य लोक खेड्यांतच राहत. ते शेतीवर उपजीविका करत. त्यांना लागणाऱ्या दैनंदिन गरजेच्या वस्तू गावातच तयार होत. भारतीय अर्थव्यवस्थेत स्थानिक कारागीर हा महत्त्वाचा दुवा होता. ही परिस्थिती इंग्रजांच्या राजवटीत बदलली.

**कापड उद्योगाचा ऱ्हास :** कापड उद्योग हा सर्वांत मोठा उद्योग होता. भारतात तयार झालेले कापड युरोपात अतिशय लोकप्रिय होते. युरोपात त्याला मोठी मागणी होती.

इंग्लंडमध्ये तयार होणारे कापड भारतात विकले जावे म्हणून इंग्रजांनी भारतीय कापड उद्योगावर जबर कर बसवले. त्यामुळे भारतीय कापड महाग आणि इंग्रजांचे कापड स्वस्त अशी परिस्थिती निर्माण झाली. इंग्रजांच्या अशा धोरणामुळे एकेकाळी भरभराटीला आलेला भारतीय कापड उद्योग डबघाईला आला. कसबी कारागीर व विणकर बेकार झाले.

**इतर उद्योगधंद्यांची पीछेहाट :** इ.स. १८५३ मध्ये इंग्रजांनी भारतात रेल्वेमार्ग सुरू केला. पुढील काळात रेल्वेमार्गांचे जाळे देशभर पसरले. या सोईमुळे ब्रिटिश माल देशाच्या कोनाकोपऱ्यांत पोहोचू लागला. यंत्रावर तयार झालेल्या परदेशी मालाशी स्थानिक कारागिरांना स्पर्धा करता येणे शक्य नव्हते. परिणामी भारतीय उद्योग, व्यवसाय बुडाले.

**शेतकरी दरिद्री बनला :** शेतसारा हे सरकारच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. पूर्वी शेतसारा हा धान्याच्या स्वरूपात भरला जात असे. इंग्रजांनी शेतसारा पैशाच्या स्वरूपात भरण्याची सक्ती केली. तो वेळच्या वेळी भरावा लागे. त्यात सूट दिली जात नसे. शेतसारा भरण्यासाठी शेतकऱ्यांकडे रोकड पैसा नसे, म्हणून ते जमिनी गहाण टाकून सावकाराकडून कर्ज घेत. कर्जाची परतफेड करता आली नाही, तर त्यांना जमिनी विकाव्या लागत.

ज्या पिकांना परदेशात मागणी असेल, तीच पिके शेतकऱ्यांनी काढावीत, इतर पिके काढू नयेत, अशी इंग्रजांनी भारतीय शेतकऱ्यांवर सक्ती केली. त्यामुळे कापूस, तंबाखू, नीळ इत्यादी नगदी पिके शेतकऱ्यांना काढावी लागत. नगदी पिके म्हणजे रोख पैसा मिळवून देणारी पिके. ही पिके इंग्रज व्यापारी त्यांच्याकडून कमी किमतीला विकत घेत आणि जास्त किमतीला विकत. त्यामुळे शेतकरी वर्ग नाडला जाऊ लागला.

**इंग्रजांनी केलेल्या सुधारणा :** इंग्रजांनी भारताचे आर्थिक शोषण केले, पण राज्यकारभाराच्या सोईसाठी त्यांनी काही सुधारणाही अमलात आणल्या. या सुधारणांमुळे भारतीयांना काही अप्रत्यक्ष फायदे झाले.

भारतात रेल्वेमार्गांचे जाळे पसरले. रेल्वेसारख्या दळणवळणाच्या सोईमुळे भारतीयांचे परस्परांतील संबंध वाढीस लागले.

गाव, तालुका, जिल्हा, प्रांत अशा पातळ्यांवर सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. तलाठी, पोलीस पाटील, कलेक्टर, न्यायाधीश यांसारख्या अधिकाऱ्यांमुळे प्रशासनाची कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण झाली.

पाश्चात्त्य शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू झाल्या. त्यामुळे पाश्चात्त्य कल्पना व विचारांचा भारतात प्रसार होऊ लागला. छापखाने आल्यामुळे

वर्तमानपत्रे, विविध विषयांवरचे ग्रंथ प्रसिद्ध होऊ लागले. यामुळे भारतीय समाजात वैचारिक जागृती होऊ लागली.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) इंग्रजांच्या आर्थिक व व्यापारी धोरणांमुळे भारतातील .......... ओघ इंग्लंडकडे जाऊ लागला.

(आ) इंग्रजांनी भारतात इ. स. ............ मध्ये रेल्वेमार्ग सुरू केला.

(इ) इंग्रजांनी शेतसारा ............ च्या स्वरूपात भरण्याची सक्ती केली.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) इंग्रजांनी भारतीय कापड उद्योगावर जबर कर का बसवले ?

(आ) इंग्रजांनी शेतकऱ्यांवर कोणती नगदी पिके काढण्याची सक्ती केली ?

(इ) इंग्रजांनी भारतात सुधारणा का केल्या ?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शेतकऱ्यांना आपल्या जमिनी का विकाव्या लागत ?

(आ) रेल्वेमार्ग सुरू झाल्याने उद्योगधंद्यांची पीछेहाट का झाली ?

(इ) इंग्रजांनी केलेल्या सुधारणांमुळे झालेले कोणतेही दोन फायदे सांगा.

**४. उपक्रम :**

तुमच्या परिसरातील हस्तउद्योगांची माहिती मिळवा. त्या वस्तूंचे शाळेत प्रदर्शन भरवा.

# ८. नवे विचार : नवी दृष्टी

इंग्रजांच्या राजवटीत पाश्चात्त्य शिक्षणपद्धती भारतात सुरू झाली. देशात नवनव्या कल्पना व विचार येऊ लागले.

भारतीय समाजातील जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता, सतीची चाल, बालविवाह अशा अनिष्ट चालीरीतींमुळे भारतीय समाजाची प्रगती खुंटली होती. ही स्थिती बदलण्यासाठी आधुनिक शिक्षण घेतलेल्या भारतीय विचारवंतांनी प्रयत्न सुरू केले. त्यातून समाजसुधारणा चळवळीची सुरुवात झाली.

**राजा राममोहन रॉय :** भारतातील समाजसुधारणा चळवळीचे राजा राममोहन रॉय हे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन या धर्मांचा अभ्यास केला होता. सर्व धर्मांची शिकवण सारखीच आहे, असे त्यांचे ठाम मत होते. बालविवाह, सतीची चाल या अनिष्ट रूढींवर त्यांनी प्रखर टीका केली. त्यांच्या प्रयत्नाने इ. स. १८२९ मध्ये ब्रिटिश सरकारने सतीची चाल कायद्याने बंद केली.



राजा राममोहन रॉय

भारतातील शिक्षणपद्धतीत बदल केल्याशिवाय समाजाची उन्नती होणार नाही, असे त्यांना वाटे. त्यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचा पुरस्कार केला.

आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी 'ब्राम्हो समाज' ही संस्था स्थापन केली. समाजाला त्यांनी समानतेचा व बंधुभावाचा संदेश दिला. राजा राममोहन रॉय यांना 'आधुनिक भारताचे जनक' असे म्हणतात.



गोपाळ हरी देशमुख

**गोपाळ हरी देशमुख :** 'प्रभाकर' या साप्ताहिकात गोपाळ हरी देशमुख हे 'लोकहितवादी' या टोपण नावाने लेखन करत. आधुनिक शिक्षणातून समाजसुधारणा घडेल, असा त्यांना विश्वास होता. समाजातील जातिभेद, धर्मभोळेपणा यांवर त्यांनी टीका केली. विधवाविवाहाचा पुरस्कार केला. वाचनालयाची चळवळ त्यांनी महाराष्ट्रभर सुरू केली. आपल्या देशात तयार होणारा मालच वापरावा, असा त्यांचा आग्रह होता.

**स्वामी दयानंद सरस्वती :** समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, मूर्तिपूजा यांना विरोध करणारे स्वामी दयानंद सरस्वती हे थोर विचारवंत होते. बालविवाह, जातिभेद याला त्यांनी प्रखर विरोध केला. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना शिक्षणाचा हक्क आहे, असे त्यांचे मत होते. आपले विचार सामान्य लोकांपर्यंत पोहचावेत म्हणून त्यांनी 'आर्य समाज' या संस्थेची स्थापना केली.



स्वामी दयानंद सरस्वती

**महात्मा जोतीराव फुले :** महात्मा फुले यांनी समाजसुधारणांचे विचार मांडले. त्यांनी जातिभेदाला

विरोध केला. मुलींना व दलितांना शिक्षण घेता यावे म्हणून पुण्यात शाळा काढल्या. सर्व लोकांना आधुनिक शिक्षण मिळावे, असा त्यांचा आग्रह होता. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, अशी त्यांनी सरकारकडे मागणी केली. 'सत्यशोधक समाज' ही संस्था स्थापन करून त्याद्वारे त्यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. देशाचे ऐक्य व स्वातंत्र्य यांसाठी सामाजिक समता आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्या लिखाणातून महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांवरील अन्यायाला वाचा फोडली.



महात्मा जोतीराव फुले

**सावित्रीबाई फुले :** सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका होत्या. समाजाच्या विरोधाला न जुमानता मुलींना शिकवण्याचे कार्य त्यांनी केले. अनाथ बालकांचे संगोपन केले. महात्मा फुले यांच्या निधनानंतरही सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाचे कार्य चालू ठेवले.



सावित्रीबाई फुले

**सर सय्यद अहमद खान :** मुस्लिम समाजाच्या उन्नतीसाठी सर सय्यद अहमद खान यांनी मोलाची कामगिरी केली. त्याकाळच्या मुस्लिम समाजात पाश्चात्त्य शिक्षणाचा अभाव होता. मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी या शिक्षणाची गरज आहे, हे त्यांनी पटवून दिले. मुस्लिम स्त्रियांनी पाश्चात्त्य शिक्षण घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी अलीगढ येथे शिक्षण संस्था स्थापन केली.



सर सय्यद अहमद खान

**महादेव गोविंद रानडे :** न्यायमूर्ती रानडे हे समाजसुधारणा चळवळीत अग्रभागी असलेले विचारवंत होते. त्यांनी जातिभेदाला विरोध केला. स्त्री-शिक्षण आणि विधवाविवाहाचा पुरस्कार केला. पाश्चात्त्य शिक्षणाचे महत्त्व त्यांनी समाजाला पटवून दिले. समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी, यासाठी ते सतत झटले. भारतात औद्योगिक प्रगती व्हावी, असा त्यांचा आग्रह होता.



महादेव गोविंद रानडे

**स्वामी विवेकानंद :** स्वामी विवेकानंद यांनी सर्व जगाला मानवजातीच्या सेवेचा संदेश दिला. दीन-दुबळ्या लोकांना मदत करणे, मानवाची निःस्वार्थीपणे सेवा करणे हाच खरा धर्म आहे, अशी त्यांची शिकवण

होती. अंधश्रद्‌धा, कर्मकांड, अनिष्ट चालीरीती यांवर त्यांनी कडाडून हल्ला केला. जातिभेदाला विरोध केला. समाजाच्या सेवेसाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन' या संस्थेची स्थापना केली.



स्वामी विवेकानंद

**ताराबाई शिंदे :** ताराबाई शिंदे यांनी 'स्त्रीपुरुषतुलना' या आपल्या पुस्तकातून स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली. अनिष्ट रूढी, परंपरा यांवर टीका केली. स्त्रियांची दुःखे दूर व्हावीत, त्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे, असे विचार त्यांनी मांडले.

**पंडिता रमाबाई :** स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कार्यात पंडिता रमाबाई यांनी महत्त्वाचे कार्य केले. बालविवाहास त्यांनी विरोध केला. विधवाविवाहास प्रोत्साहन दिले. विधवांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी 'शारदा सदन' ही संस्था स्थापन केली.



पंडिता रमाबाई

समाजसुधारणेचे असेच विचार पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, वीरेशलिंगम पंतलू, गोपाळ गणेश आगरकर, नारायण गुरू, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी विठ्ठल रामजी

शिंदे, राजर्षी शाहूमहाराज इत्यादींनी मांडले. आधुनिकता व मानवता या मूल्यांवर ही सुधारणा चळवळ आधारित होती. त्यामुळे समाजात चैतन्य निर्माण झाले. यातूनच राष्ट्रीय चळवळीचा उदय झाला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) राजा राममोहन रॉय भारतातील ………… चळवळीचे आद्य प्रवर्तक होते.

(आ) वाचनालयाची चळवळ ………… यांनी महाराष्ट्रभर सुरू केली.

(इ) ताराबाई शिंदे यांनी ………… या पुस्तकातून स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली.

(ई) सर सय्यद अहमद खान यांनी पाश्चात्त्य शिक्षण देण्यासाठी ………… येथे शिक्षण संस्था स्थापन केली.

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) ब्राम्हो समाज | (१) गोपाळ हरी देशमुख |
| (आ) आर्य समाज | (२) स्वामी विवेकानंद |
| (इ) सत्यशोधक समाज | (३) स्वामी दयानंद सरस्वती |
| (ई) रामकृष्ण मिशन | (४) महात्मा जोतीराव फुले |
| | (५) राजा राममोहन रॉय |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) राजा राममोहन रॉय यांनी समाजाला कोणता संदेश दिला ?

(आ) स्वामी दयानंद सरस्वती यांनी कोणत्या गोष्टींना प्रखर विरोध केला ?

(इ) महात्मा फुले यांनी सरकारकडे कोणती मागणी केली ?

(ई) न्यायमूर्ती रानडे यांचा कोणता आग्रह होता ?

(उ) पंडिता रमाबाई यांनी शारदा सदन ही संस्था का स्थापन केली ?

४. उपक्रम :

भारतातील समाजसुधारक व त्यांनी स्थापन केलेल्या संस्था यांचा तक्ता शिक्षकांच्या मदतीने तयार करा.

❑❑❑

**पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर**

बंगालमधील थोर समाजसुधारक. स्त्री-शिक्षणाचे ते पुरस्कर्ते होते. विधवाविवाहाची चळवळ सुरू केली.

**वीरेशलिंगम पंतलू**

मद्रास प्रांतात समाजसुधारणेचे कार्य यांनी केले. आपले सुधारणाविषयक विचार लोकांपर्यंत पोहोचावेत म्हणून त्यांनी 'हास्य-संजीवनी' हे वृत्तपत्र सुरू केले.

**गोपाळ गणेश आगरकर**

केसरी वृत्तपत्राचे ते पहिले संपादक होते. त्यांनी 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरू केले. 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' अशी त्यांची भूमिका होती.

**नारायण गुरू**

केरळमधील एक थोर समाजसुधारक. अस्पृश्यता, जातिभेद आणि बालविवाह इत्यादी प्रथांना त्यांनी प्रखर विरोध केला.

**महर्षी धोंडो केशव कर्वे**

स्त्री-शिक्षणाचे खंदे पुरस्कर्ते. त्यांनी महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. विधवाविवाहाला प्रोत्साहन दिले.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे**

दलितांच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. देवदासी प्रथेविरुद्ध आवाज उठवला.

**राजर्षी शाहूमहाराज**

बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. वेठबिगारीच्या पद्धतीवर बंदी घातली.

# ९. राष्ट्रीय सभेची स्थापना

राष्ट्रीय जागृती होऊ लागल्यामुळे भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांत राजकीय चळवळी सुरू झाल्या होत्या. त्याला अखिल भारतीय स्वरूप देण्याचे प्रयत्नही या काळात सुरू झाले. 'इंडियन असोसिएशन' या संघटनेने कोलकता येथे अखिल भारतीय परिषद भरवली. या प्रयत्नांतून राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची कल्पना पुढे आली.

दादाभाई नौरोजी, बद्रुद्दीन तय्यबजी, फिरोजशहा मेहता इत्यादी भारतीय नेत्यांना असे वाटू लागले, की राष्ट्रीय पातळीवर एखादी संघटना असावी. त्यांनी निवृत्त ब्रिटिश अधिकारी सर ॲलन ह्यूम यांच्या सहकार्याने 'इंडियन नॅशनल काँग्रेस'ची म्हणजे भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना केली.

**राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन :** राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे भरले होते. दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, पी. रंगय्या नायडू, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी नेते त्यात सहभागी होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी व्योमेशचंद्र बॅनर्जी होते. अधिवेशनात देशापुढील अनेक समस्यांवर चर्चा करण्यात आली. या पुढील काळात राष्ट्रीय सभेची अधिवेशने प्रत्येक वर्षी निरनिराळ्या शहरांत भरू लागली. राष्ट्रीय सभेला लोकांचा पाठिंबा वाढत गेला. सर्व धर्मांच्या लोकांना राष्ट्रीय चळवळीत एकत्र आणण्याचा राष्ट्रीय सभेचा प्रयत्न होता.



व्योमेशचंद्र बॅनर्जी

भारतीयांची ही एकजूट ब्रिटिश सरकारला धोकादायक वाटू लागली. शासकीय सेवेत असलेल्या भारतीयांनी राष्ट्रीय सभेच्या सभांना हजर राहू नये, असा नियम सरकारने केला. मुस्लिम समाजाने राष्ट्रीय सभेत सहभागी होणे त्यांच्या हिताचे नाही, असा प्रचार ब्रिटिशांनी सुरू केला; परंतु याचा फारसा परिणाम बद्रुद्दीन तय्यबजी यांच्यासारख्या नेत्यांवर झाला नाही. ब्रिटिशांच्या धोरणामुळे भारतीयांची होणारी पिळवणूक आणि त्यांचे वाढते दारिद्र्य यांवर राष्ट्रीय सभेने आपले लक्ष केंद्रित केले. सरकारी नोकऱ्यांत भारतीयांना स्थान मिळावे, शेतकऱ्यांवरील कराचा बोजा कमी करावा, अशा प्रकारच्या मागण्या त्यांनी केल्या.



गोपाळ कृष्ण गोखले

**मवाळ व जहाल गट :** राष्ट्रीय सभेच्या प्रारंभीच्या काळात तिचे नेतृत्व पूर्णपणे नेमस्तांच्या म्हणजे मवाळांच्या हाती होते. सरकारला निवेदने, अर्ज-विनंत्या केल्यास ते आपल्या मागण्या मान्य करेल, यावर त्यांचा विश्वास होता. सनदशीर मार्गाने सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. गोपाळ कृष्ण गोखले हे नेमस्तांचे अग्रणी होते.

अर्ज-विनंत्यांचा विचार करून ब्रिटिश सरकार भारतीयांच्या मागण्या मान्य करेल, ही भारतीयांची आशा फोल ठरली. त्यामुळे राष्ट्रीय सभेतील काही तरुण अस्वस्थ होऊ लागले. नेमस्तांच्या मार्गाने जाऊन राजकीय चळवळ पुढे नेता येणार नाही, असे त्यांना वाटू लागले. केवळ अर्ज-विनंत्या करून भागणार नाही, तर समाजातील सर्व लोकांमध्ये जागृती

निर्माण केली पाहिजे, स्वराज्यासाठी प्रखर देशभक्ती निर्माण झाली पाहिजे, जनतेने आपले हक्क संघटित होऊन, झगडून मिळवले पाहिजेत, यांवर त्यांचा विश्वास होता. अशी विचारसरणी असणाऱ्यांना 'जहाल' असे म्हणतात. अशा तरुणांचे नेतृत्व लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल यांनी केले.



लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळकांनी 'केसरी' व 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरू केली. या वृत्तपत्रांतून ते भारतीय जनतेला आपल्या हक्कांची जाणीव करून देऊ लागले. सार्वजनिक गणपती उत्सव आणि शिवजयंती उत्सव यांच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत केली. आपल्या लिखाणातून व भाषणांतून लोकांना निर्भय व स्वाभिमानी बनण्यास शिकवले.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(अ) 'इंडियन असोसिएशन' या संघटनेने ............ येथे अखिल भारतीय परिषद भरवली.

(कोलकता, कराची, कटक, कालिकत)

(आ) राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन ............ येथे भरले होते.

(पुणे, मुंबई, कोलकता, दिल्ली)

(इ) केसरी व मराठा ही वृत्तपत्रे ………… यांनी सुरू केली.
(दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, लोकमान्य टिळक, गोपाळ कृष्ण गोखले)

(ई) राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ………… हे होते.
(सर ॲलन ह्यूम, व्योमेशचंद्र बॅनर्जी, पी. रंगय्या नायडू, गोपाळ गणेश आगरकर)

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) राष्ट्रीय सभेने कोणत्या गोष्टींवर आपले लक्ष केंद्रित केले ?

(आ) मवाळ नेत्यांचा कोणत्या गोष्टीवर विश्वास होता ?

(इ) लोकमान्य टिळकांनी लोकांमध्ये कोणती भावना जागृत केली?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) ब्रिटिशांनी राष्ट्रीय सभेबाबत कोणता प्रचार केला ?

(आ) जहाल विचारसरणीच्या नेत्यांचा कोणत्या गोष्टींवर विश्वास होता ?

❑❑❑

| राष्ट्रीय सभेची सुरुवातीची अधिवेशने | | | |
|---|---|---|---|
| अ. क्र. | अध्यक्ष | अधिवेशनाचे ठिकाण | वर्ष |
| १. | व्योमेशचंद्र बॅनर्जी | मुंबई | १८८५ |
| २. | दादाभाई नौरोजी | कोलकता | १८८६ |
| ३. | बद्रुद्दीन तय्यबजी | चेन्नई | १८८७ |
| ४. | जॉर्ज युल | अलाहाबाद | १८८८ |
| ५. | सर विल्यम वेडरबर्न | मुंबई | १८८९ |

# १०. राष्ट्रीय चळवळीची वाटचाल

लॉर्ड कर्झन याने इ. स. १९०५ मध्ये बंगाल प्रांताची फाळणी केली. बंगाल प्रांताचा विस्तार मोठा असल्याने प्रशासकीय सोईसाठी फाळणी केल्याचे कारण देण्यात आले; परंतु त्यामागील खरा हेतू हिंदू व मुस्लिम समाजांत फूट पाडून राष्ट्रीय चळवळ कमकुवत करणे हा होता. मुस्लिम बहुसंख्य असलेला पूर्व बंगाल व हिंदू बहुसंख्य असलेला बिहार व ओरिसा मिळून बनलेला पश्चिम बंगाल असे दोन प्रांत निर्माण करण्यात आले. राष्ट्रीय सभेने बंगालच्या फाळणीला कडाडून विरोध केला.

**वंग-भंग आंदोलन :** बंगालच्या फाळणीविरुद्ध जे आंदोलन झाले त्याला वंग-भंग आंदोलन असे म्हणतात. या आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी केले. फाळणीविरुद्ध तीव्र आंदोलन झाले तरीही ब्रिटिश सरकारने बंगालची फाळणी रद्द केली नाही. उलट आंदोलकांविरुद्ध दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. आंदोलकांवर लाठीहल्ले केले. वंग-भंग चळवळीत 'वंदे मातरम्' हे आंदोलकांचे घोषगीत होते. हे गीत म्हणणाऱ्या शाळकरी मुलांनाही शिक्षा करण्यात आल्या.



दादाभाई नौरोजी

बंगालच्या फाळणीविरुद्ध देशभर आंदोलन करण्यात आले. दादाभाई नौरोजींनी भारतीयांना 'अखंड चळवळ करा' असा संदेश दिला. राष्ट्रीय सभेने स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण असा आंदोलनाचा चारसूत्री कार्यक्रम जाहीर केला.

राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी सरकारने 'फोडा आणि राज्य करा' या धोरणाचा अवलंब केला. हिंदू, मुसलमान यांत फूट पाडण्याचा प्रयत्न केला. यातून १९०६ साली 'मुस्लिम लीग' या संघटनेची स्थापना झाली.

राष्ट्रीय आंदोलनाची वाढती शक्ती कमी करण्यासाठी सरकारने देशातील प्रमुख नेत्यांना तुरुंगात डांबले. इ. स. १९०८ मध्ये लोकमान्य टिळकांना अटक करण्यात आली. त्यांना सहा वर्षांची कारावासाची शिक्षा देण्यात आली. लोकमान्य टिळकांना झालेल्या शिक्षेमुळे देशभर संतापाची लाट उसळली. मुंबई येथील गिरणी कामगारांनी त्या शिक्षेच्या विरोधात सहा दिवस संप केला. जहाल नेत्यांनी चारसूत्री कार्यक्रम भारतभर पोचवला. वंग-भंगाचे आंदोलन उग्र होत गेले. अखेर राष्ट्रीय सभेच्या आंदोलनापुढे सरकार नमले. सरकारने बंगालची फाळणी १९११ साली रद्द केली.

**होमरूल चळवळ :** डॉ. ॲनी बेझंट या आयरिश विदुषीने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी भारतीयांना स्वराज्याचा अधिकार मिळावा अशी मागणी केली. यासाठी त्यांनी चेन्नई येथे होमरूल लीगची म्हणजे स्वराज्य संघाची स्थापना केली. या धर्तीवर लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात स्वराज्य संघाची स्थापना केली. स्वराज्य संघाच्या चळवळीला सामान्य जनतेचा पाठिंबा मिळाला. अनेक स्त्रिया या चळवळीत सहभागी झाल्या. या चळवळीने देशभर चैतन्य निर्माण झाले.

राष्ट्रीय सभेचे १९१६ साली लखनऊ येथे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात स्वराज्याची मागणी करण्यात आली. भारतीयांमधील असंतोष काही प्रमाणात कमी करणे सरकारला गरजेचे वाटू लागले, म्हणून सरकारने १९१९ साली सुधारणा कायदा मंजूर केला.


डॉ. ॲनी बेझंट

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) बंगालच्या फाळणीविरुद्ध जे आंदोलन झाले, त्याला ............ आंदोलन असे म्हणतात.

(आ) राष्ट्रीय चळवळ दडपण्यासाठी सरकारने ............ या धोरणाचा अवलंब केला.

(इ) सरकारने बंगालची फाळणी ............ साली रद्द केली.

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) बंगाल प्रांताची फाळणी | (१) ॲनी बेझंट |
| (आ) वंग-भंग आंदोलनाचे नेतृत्व | (२) लॉर्ड कर्झन |
| (इ) स्वराज्य संघाची स्थापना | (३) सुरेंद्रनाथ बॅनर्जी |
| | (४) दादाभाई नौरोजी |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दादाभाई नौरोजी यांनी भारतीयांना कोणता संदेश दिला ?

(आ) राष्ट्रीय सभेने १९१६ साली लखनऊ येथील अधिवेशनात कोणती मागणी केली ?

**४. कारणे द्या.**

(अ) सरकारने बंगालची फाळणी रद्द केली.

(आ) सरकारने १९१९ साली सुधारणा कायदा मंजूर केला.

**५. उपक्रम :**

दादाभाई नौरोजी व लोकमान्य टिळक यांची चरित्रे वाचा.

# ११. असहकार चळवळ

लोकमान्य टिळकांचे १९२० साली निधन झाले आणि महात्मा गांधी यांच्याकडे स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व आले.

**सत्याग्रहाचा नवा मार्ग :** दक्षिण आफ्रिकेत ब्रिटिशांची सत्ता होती. भारतातील काही लोक तेथे स्थायिक झाले होते. त्यांच्यावर आणि तेथील कृष्णवर्णीय लोकांवर ब्रिटिश राज्यकर्ते अन्याय व जुलूम करत होते. गांधीजी वकिली व्यवसाय करण्याच्या निमित्ताने दक्षिण आफ्रिकेत गेले होते. तेथे त्यांनी भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी त्यांना संघटित केले. त्यासाठी त्यांनी सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला. सत्याग्रह म्हणजे जुलमाचा अहिंसक मार्गाने केलेला प्रतिकार. अन्याय करणाऱ्या व्यक्तीचे मतपरिवर्तन करणे, यावर सत्याग्रहाचा भर होता. सत्याग्रहाच्या मार्गाने दक्षिण आफ्रिकेतील लोकांना गांधीजींनी न्याय मिळवून दिला.



महात्मा गांधी

गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून १९१५ साली भारतात परत आले. ब्रिटिश राजवटीत भारतीयांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, असे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने चळवळ चालवण्याचे ठरवले.

गांधीजींनी प्रथम बिहारमधील चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले. तेथील शेतकऱ्यांना नीळ

पिकवण्याची सक्ती ब्रिटिश मळेवाले करत असत. या अन्यायाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह केला. ब्रिटिश मळेवाल्यांच्या त्रासातून शेतकऱ्यांची सुटका झाली.

गुजरातमधील खेडा जिल्ह्यात दुष्काळ पडला होता. तरीही ब्रिटिश सरकार शेतसारा सक्तीने वसूल करत होते. गांधीजींच्या प्रोत्साहनाने शेतकऱ्यांनी या अन्यायाविरुद्ध सत्याग्रहाच्या मार्गाने लढा चालवला. अखेरीस सरकारने शेतसारा माफ केला.

**रौलट कायदा :** ब्रिटिश सरकारने भारतीयांना सुधारणा कायद्याने काही हक्क दिले, पण त्याचवेळी भारतीयांना दडपून टाकण्यासाठी कायद्याचा बडगा उगारला. त्यासाठी सरकारने 'रौलट कायदा' केला. हा कायदा अत्यंत जुलमी स्वरूपाचा होता. चौकशीशिवाय कोणालाही कारागृहात डांबण्याचा अधिकार या कायद्याने सरकारला देण्यात आला. याविरुद्ध देशभर संतापाची लाट उसळली. या कायद्याच्या निषेधार्थ गांधीजींच्या आवाहनानुसार देशभर हरताळ पाळण्यात आला. हे आंदोलन सरकारने दडपून टाकण्याचा प्रयत्न केला.

**जालियनवाला बाग हत्याकांड :** अमृतसर येथे हरताळ केल्यामुळे डॉ. सत्यपाल आणि डॉ. सैफुद्दीन किचलू या दोन नेत्यांना सरकारने हद्दपार केले. या हद्दपारीच्या निषेधार्थ अमृतसर येथील जालियनवाला बागेत एक मोठी सभा भरली होती. त्या वेळी जनरल डायर या लष्करी अधिकाऱ्याने आपल्या सैन्याला गोळीबार करण्याचा आदेश दिला. गोळीबारात चारशेपेक्षा जास्त लोक ठार झाले व हजारो जखमी झाले. या घटनेनंतर पंजाबमध्ये ब्रिटिशांनी भयंकर अत्याचार सुरू केले. या अत्याचाराच्या बातम्या वणव्यासारख्या देशभर पसरल्या. त्यामुळे

सगळीकडे संतापाची लाट उसळली. या अत्याचाराचा निषेध म्हणून रवींद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश सरकारने त्यांना दिलेला 'सर' हा बहुमानाचा किताब सरकारला परत केला.

**खिलाफत चळवळ :** तुर्कस्तानच्या सुलतानास 'खलीफा' म्हणत. जगातील सर्व मुस्लिम त्याला आपला धर्मप्रमुख मानत असत. तुर्कस्तानने इंग्लंडच्या विरुद्‌ध पहिल्या महायुद्‌धात भाग घेतला. भारतातील मुस्लिमांचे युद्‌धात सहकार्य मिळवण्यासाठी खलीफाच्या सत्तेला आपण धक्का लावणार नाही, असे आश्वासन ब्रिटिशांनी भारतीय मुस्लिमांना दिले होते, मात्र दिलेले आश्वासन इंग्रजांनी पाळले नाही. युद्‌ध संपताच त्यांनी तुर्की साम्राज्याचे तुकडे केले आणि त्याचे काही भाग आपल्या ताब्यात घेतले. यामुळे भारतातील मुस्लिम संतापले. इंग्रजांच्या विरोधात खलीफाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी जी चळवळ सुरू केली तिला 'खिलाफत चळवळ' असे म्हणतात. राष्ट्रीय सभेने या चळवळीला सक्रिय पाठिंबा दिला. याला प्रतिसाद म्हणून खिलाफत चळवळीच्या नेत्यांनी असहकार चळवळीला पाठिंबा दिला.

**असहकार चळवळ :** ब्रिटिशांशी असहकार केला, तर ब्रिटिश एक दिवसही राज्यकारभार चालवू शकणार नाहीत, असे गांधीजींचे मत होते. त्यासाठी राष्ट्रीय सभेने असहकाराचा कार्यक्रम मंजूर केला. ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्या, मानसन्मान नाकारायचे, सरकारी शाळा-महाविद्यालयांमध्ये जायचे नाही, परदेशी मालावर बहिष्कार घालायचा, वकिलांनी सरकारी न्यायालयातील कामावर बहिष्कार टाकायचा, असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

असहकार आंदोलनाबरोबरच गांधीजींनी अस्पृश्यता नष्ट करणे, हिंदू-

मुस्लिम ऐक्य घडवून आणणे, दारूबंदी असा विधायक कार्यक्रम हाती घेतला.

असहकार चळवळीला देशभर प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी सरकारी शाळांतून नावे काढली व राष्ट्रीय शाळांमध्ये प्रवेश घेतला. अनेकांनी वकिली करण्याचे नाकारले. लोकांनी परदेशी कापडाच्या होळ्या केल्या. डॉ. राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई पटेल इत्यादी नेत्यांनी या चळवळीत भाग घेतला. या चळवळीत स्त्रियांचा सक्रिय सहभाग होता.

असहकार चळवळीचा जोर जसजसा वाढत गेला तसतशी सरकारची दडपशाही वाढत गेली. उत्तर प्रदेशातील चौरीचौरा येथे सत्याग्रहींनी शांततापूर्ण मिरवणूक काढली. या मिरवणुकीवर पोलिसांनी लाठीहल्ला केला, म्हणून चिडून आंदोलकांनी पोलीस चौकीला आग लावली. या आगीत काही पोलीस मृत्युमुखी पडले. असहकार चळवळीला हिंसक वळण लागणे गांधीजींना मान्य नव्हते, म्हणून त्यांनी ही चळवळ थांबवली. तरीही सरकारने गांधीजींना अटक केली.

असहकार चळवळ थांबली, तरी देशात अनेक ठिकाणी सत्याग्रहाच्या घटना घडत होत्या. अशा सत्याग्रहांना सरकार दाद देत नव्हते; म्हणून मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास इत्यादी नेत्यांना कायदेमंडळात निवडून जावे व तेथे सरकारच्या दडपशाहीला विरोध करावा असे वाटले. यासाठी त्यांनी 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला. त्यांनी कायदेमंडळात सरकारच्या अन्याय्य धोरणांना विरोध केला.

**सायमन कमिशन :** ब्रिटिशांनी भारतास दिलेल्या सुधारणांची अंमलबजावणी कितपत झाली, हे पाहण्यासाठी इंग्लंडहून एक समिती भारतात आली. सर जॉन सायमन हे या समितीचे अध्यक्ष होते, म्हणून या समितीला 'सायमन कमिशन' असे म्हणतात. या समितीत एकही भारतीय प्रतिनिधी नव्हता, त्यामुळे राष्ट्रीय सभेने सायमन कमिशनवर बहिष्कार

टाकला. देशभर या कमिशनला काळे झेंडे दाखवून त्याचा निषेध करण्यात आला. जेथे जेथे सायमन कमिशन गेले, त्या त्या ठिकाणी 'सायमन परत जा' अशा घोषणा देण्यात आल्या. लाहोर येथे सायमन कमिशनविरुद्ध झालेल्या निदर्शनाचे नेतृत्व लाला लजपतराय यांनी केले. त्या वेळी पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. पुढे त्यातच त्यांचा अंत झाला.


लाला लजपतराय

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अन्यायाविरुद्ध ………… च्या मार्गाने लढा चालवला.

(आ) चौकशीशिवाय कोणालाही कारागृहात डांबण्याचा अधिकार ………… या कायद्याने सरकारला देण्यात आला.

(इ) तुर्कस्तानच्या सुलतानास ………… म्हणत.

(ई) लाहोर येथे सायमन कमिशनविरुद्ध झालेल्या निदर्शनाचे नेतृत्व ………… यांनी केले.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) महात्मा गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना संघटित का केले ?

(आ) ब्रिटिश मळेवाले चंपारण्यातील शेतकऱ्यांवर कोणती सक्ती करत ?

(इ) राष्ट्रीय सभेने असहकाराचा कार्यक्रम का मंजूर केला ?

(ई) राष्ट्रीय सभेने सायमन कमिशनवर बहिष्कार का टाकला ?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) असहकार चळवळीची विधायक बाजू कोणती होती ?

(आ) गांधीजींनी असहकाराची चळवळ का थांबवली ?

(इ) स्वराज्य पक्षाची स्थापना का करण्यात आली ?

४. उपक्रम :

महात्मा गांधीजींच्या चित्रांचा संग्रह करा आणि वर्गात प्रदर्शन भरवा.

❑❑❑

**लाला लजपतराय**

लाला लजपतराय हे निष्णात वकील होते. ते 'वंदे मातरम' व 'पंजाबी' या दैनिकांतून लेखन करत. त्यांनी 'पीपल' नावाचे इंग्रजी मासिक सुरू केले होते. लाला लजपतराय यांनी 'यंग इंडिया', 'महान अशोक', 'छत्रपती शिवाजी' इत्यादी पुस्तके लिहिली.



चळवळीत स्त्रियांचा सहभाग

# १२. सविनय कायदेभंग



पंडित जवाहरलाल नेहरू

लाहोर येथे १९२९ च्या डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते. या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत करण्यात आला. २६ जानेवारी १९३० रोजी जनतेने स्वातंत्र्याची शपथ घेतली. लाहोर अधिवेशनात सविनय कायदेभंगाचा ठरावही मंजूर करण्यात आला.

**सविनय कायदेभंग :** गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली. सविनय कायदेभंग म्हणजे पूर्वसूचना देऊन जुलमी कायदे मोडणे व प्रतिकार न करता दिली जाणारी शिक्षा स्वीकारणे. मीठ माणसाच्या रोजच्या जीवनातील आवश्यक वस्तू आहे, तरीही सरकारने मिठावर कर बसवला होता; म्हणून या अन्यायकारक कराविरुद्ध मिठाचा सत्याग्रह करण्याचे गांधीजींनी ठरवले.



मिठाचा सत्याग्रह

**दांडी यात्रा :** १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधी आपल्या

सहकाऱ्यांसह गुजरातमधील साबरमती आश्रमातून दांडी येथील समुद्रकिनाऱ्याकडे पायी निघाले. साबरमती ते दांडी हे अंतर ३८५ किलोमीटर होते. वाटेत त्यांना गावोगावचे लोक येऊन मिळाले. गांधीजी दांडी येथे ५ एप्रिल रोजी पोहोचले. दुसऱ्या दिवशी समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून त्यांनी मिठाचा कायदा मोडला. गुजरातमधील धारासना येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले.



सरोजिनी नायडू

देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू झाली. जंगलातील झाडे तोडून लोकांनी जंगल कायदा मोडला. शेतकऱ्यांनी शेतसारा देण्यास नकार दिला. हातात तिरंगी झेंडा घेऊन मुंबई येथील गिरणी कामगार बाबू गेनू याने परदेशी कापड वाहून नेणाऱ्या ट्रकसमोर आडवे पडून देशासाठी बलिदान केले. वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफारखान यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ झाली. सोलापूर येथे सत्याग्रहात भाग घेतलेल्या मल्लाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे यांना फाशी देण्यात आले.



खान अब्दुल गफारखान

सविनय कायदेभंग चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे या चळवळीत स्त्रिया, शेतकरी, आदिवासी, दलित यांचाही सक्रिय सहभाग होता. कस्तुरबा गांधी, अवंतिकाबाई गोखले, हंसाबेन मेहता, कमला नेहरू अशा अनेक स्त्रियांनी यात हिरिरीने भाग घेतला होता.

**गोलमेज परिषद** : भारताला राजकीय सुधारणा देण्याचा आराखडा तयार करण्यासाठी लंडन येथे तीन गोलमेज परिषदा झाल्या. या तिन्ही परिषदांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते. पहिल्या परिषदेत राष्ट्रीय सभेचा सहभाग नव्हता, तथापि याच परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटीश सरकारकडे भारतासाठी लोकशाही राज्याची मागणी केली. तसेच त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. दुसऱ्या परिषदेला गांधीजी राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून हजर राहिले. तेथे गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्याची मागणी केली, पण ती मान्य झाली नाही. तिसऱ्या परिषदेला राष्ट्रीय सभेचा एकही प्रतिनिधी उपस्थित राहिला नाही. या परिषदेत इंग्लंडचे प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा घोषित केला.

**पुणे करार** : जातीय निवाड्यानुसार दलितांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात येणार होते. याविरुद्ध गांधीजींनी येरवडा कारागृहात आमरण उपोषण सुरू केले. राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. व्यापक राष्ट्रीय हित लक्षात घेऊन ही विनंती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्य केली. या करारानुसार स्वतंत्र



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मतदारसंघाऐवजी दलितांना कायदेमंडळात १४८ राखीव जागा द्याव्यात, असे ठरवण्यात आले. या समझोत्यास 'पुणे करार' असे म्हणतात. पुणे करारानंतर गांधीजींनी उपोषण सोडले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) गुजरातमधील धारासना येथील मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व ............... यांनी केले.

(आ) मुंबई येथील गिरणी कामगार ............... याने परदेशी कापड नेणाऱ्या ट्रकसमोर आडवे पडून देशासाठी बलिदान केले.

(इ) वायव्य सरहद्द प्रांतात ............... यांच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ झाली.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) १९२९ च्या लाहोर अधिवेशनात कोणता ठराव संमत करण्यात आला ?

(आ) सविनय कायदेभंग म्हणजे काय ?

(इ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्या गोलमेज परिषदेत भारतासाठी कोणती मागणी केली ?

(ई) दुसऱ्या गोलमेज परिषदेत गांधीजींनी कोणती मागणी केली ?

**३. दोन ते तीन वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) दांडी यात्रा (आ) पुणे करार

**४. उपक्रम :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र वाचा.

□□□

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लहानपणापासूनच वाचनाचा छंद होता. पुस्तके त्यांना जिवलग मित्रांपेक्षा मोलाची वाटत. शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्यासाठी घ्यायचे, हे त्यांना मान्य नव्हते. शिक्षणाचा उपयोग सामान्य माणसाच्या सुखासाठी केला पाहिजे, असे त्यांना वाटत असे.

# १३. सशस्त्र क्रांतिकारी चळवळ

भारतीय राष्ट्रीय सभेने भारताला स्वतंत्र करण्यासाठी शांततामय, अहिंसक व सनदशीर मार्गाचा अवलंब केला; परंतु या मार्गाने भारत स्वतंत्र होऊ शकेल, यावर काही तरुणांचा विश्वास नव्हता. त्यामुळे त्यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबला.

राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वी ब्रिटिश सत्तेविरुद्ध महाराष्ट्रात उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके, कर्नाटकात कित्तुरची राणी चन्नमा आणि पंजाबमध्ये रामसिंह कुका यांनी सशस्त्र उठाव केले होते. १८९७ साली पुण्यात प्लेगची साथ पसरली होती. या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी रँड याने जनतेवर जुलूम, जबरदस्ती केली. म्हणून चाफेकर बंधूंनी रँडची हत्या केली. याबद्दल चाफेकर बंधूंना फाशी देण्यात आले. याच सुमारास बिहारमधील बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठाव केला. मणिपूर येथील नागा नेता जदोनांग यांनी ब्रिटिशांविरुद्ध उठाव केला. त्यांना फाशी देण्यात आले. त्यानंतर त्यांची राणी गायडीनलूने नागांचे नेतृत्व केले.

**अभिनव भारत :** क्रांतिकारकांनी ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीला सामोरे जाण्यासाठी गुप्त संघटना स्थापन केल्या. महाराष्ट्रात १९०४ साली नाशिक येथे 'अभिनव भारत' या गुप्त संघटनेची स्थापना झाली होती. बाबाराव सावरकर व त्यांचे बंधू विनायक दामोदर सावरकर यांचा या संघटनेच्या स्थापनेत पुढाकार होता. बाबाराव सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. या संघटनेचे एक सभासद अनंत लक्ष्मण कान्हेरे यांनी नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याची हत्या केली. कान्हेरे यांना फाशी देण्यात आले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे इंग्लंडमध्ये असताना भारतात गुप्तपणे क्रांतिकारकांना शस्त्रे पाठवत असत. ब्रिटिश सरकारविरोधी कारवायांबद्दल त्यांना पन्नास वर्षांची शिक्षा झाली. ही खडतर शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमान येथील कारागृहात ठेवण्यात आले. काही काळाने त्यांना रत्नागिरी येथे आणण्यात आले. पुढे सरकारने त्यांची सुटका केली.



स्वातंत्र्यवीर सावरकर

**अनुशीलन समिती :** बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही क्रांतिकारी संघटना कार्यरत होती. बारींद्रकुमार घोष आणि जतींद्रनाथ बॅनर्जी या तरुणांनी या संघटनेची स्थापना केली. मुझफ्फरपूर येथील किंग्जफोर्ड या जुलमी न्यायाधीशाने स्वदेशी चळवळीतील अनेक तरुणांना कठोर शिक्षा ठोठावल्या होत्या. खुदीराम बोस या क्रांतिकारकाने किंग्जफोर्डच्या गाडीवर बॉंब टाकला. त्यामुळे त्याला फाशीची शिक्षा झाली. अनुशीलन समितीच्या अनेक कार्यकर्त्यांना पकडण्यात आले. यांपैकी अरविंद घोष हे एक होत. त्यांचे या संघटनेला मार्गदर्शन मिळत असे.

महाराष्ट्र, बंगाल या प्रदेशांबरोबर देशातील इतर भागांतही क्रांतिकारी चळवळींना वेग आला. पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेशात क्रांतिकारी केंद्रे उभारली. मद्रास प्रांतातही क्रांतिकारी कार्य चालू होते.

**इंडिया हाउस :** भारतातील क्रांतिकार्याला परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांकडून मदत मिळत असे. अशी मदत करणाऱ्यांमध्ये बॅरिस्टर श्यामजी कृष्ण वर्मा हे एक होते. त्यांनी लंडन येथे 'इंडिया

हाउस'ची स्थापना केली. त्यांचे हे निवासस्थान भारतीय क्रांतिकारी चळवळीचे केंद्र बनले. इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या राष्ट्रीय वृत्तीच्या भारतीयांना श्यामजी कृष्ण वर्मा शिष्यवृत्त्या देत. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला होता. या केंद्राच्या साहाय्याने सेनापती बापट, हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास यांनी बाँब तयार करण्याची माहिती मिळवली. ती भारतातील क्रांतिकारकांना पुरवली. ब्रिटिश अधिकारी कर्झन वायली याचा इंडिया हाउसच्या चळवळीला विरोध होता, म्हणून मदनलाल धिंग्रा या क्रांतिकारकाने त्याची हत्या केली. याबद्दल धिंग्रा यांना फाशीची शिक्षा झाली.



मादाम कामा

मादाम कामा या श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या सहकारी होत्या. जर्मनीत स्टुटगार्ट येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषदेत त्यांनी भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला. याच परिषदेत मादाम कामा यांनी तयार केलेला भारताचा ध्वज फडकावला होता.

**गदर संघटना :** ब्रिटिशविरोधी क्रांतिकार्याला गती देणे, भारताला स्वतंत्र करण्यासाठी लढाऊ सैनिक तयार करणे, ही गदर संघटनेची प्रमुख उद्दिष्टे होती. लाला हरदयाळ, डॉ. खानखोजे यांनी गदर संघटनेची स्थापना केली.

**हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन :** सचिंद्रनाथ संन्याल, राजेंद्र लाहिरी, अशफाक-उल्ला-खान इत्यादींनी 'हिंदुस्थान रिपब्लिकन

असोसिएशन' ही क्रांतिकारी संघटना १९२४ साली स्थापन केली. ब्रिटिश सत्ता संपुष्टात आणून भारतात प्रजासत्ताक संघराज्य स्थापन करणे हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. क्रांतिकार्यासाठी पैसा आवश्यक होता. तो उभा करण्यासाठी क्रांतिकारकांनी ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी रेल्वे स्टेशनजवळ सरकारी खजिना लुटला. या संघटनेच्या अनेक सभासदांना अटक होऊन फाशीची शिक्षा झाली, परंतु चंद्रशेखर आझाद हे पोलिसांच्या हाती लागले नाहीत.



चंद्रशेखर आझाद


भगतसिंग, सुखदेव, चंद्रशेखर आझाद इत्यादींनी 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या गुप्त संघटनेची स्थापना १९२८ साली केली. चंद्रशेखर आझाद हे या संघटनेच्या सेनाविभागाचे प्रमुख होते.

ब्रिटिश सरकारने कामगारांचे हक्क व जनतेचे राजकीय हक्क यांवर बंधने घालणारी दोन विधेयके मध्यवर्ती कायदेमंडळात मांडली. या विधेयकांना विरोध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात बैठक चालू असताना बॉंब टाकले, मात्र ते टाकताना कोणालाही दुखापत होणार नाही, याची काळजी घेतली. 'इन्किलाब झिंदाबाद' अशी घोषणा देत ते पोलिसांच्या स्वाधीन झाले.

लाला लजपतराय यांच्या मृत्यूला सॉंडर्स हा ब्रिटिश अधिकारी जबाबदार होता, म्हणून सॉंडर्सची हत्या करण्यात आली. या हत्येचा आरोप भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्यावर ठेवून त्यांना फाशी देण्यात आले. चंद्रशेखर आझाद हे पोलिसांशी झालेल्या चकमकीत ठार झाले.



भगतसिंग



सुखदेव



राजगुरू

**मीरत कट खटला :** याच सुमारास कामगार चळवळीने जोर धरला. या चळवळीवर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. तो रोखण्यासाठी सरकारने श्रीपाद अमृत डांगे, मिरजकर, निंबकर, मुझफ्फर अहमद इत्यादी नेत्यांना अटक केली. मीरत येथे भरलेल्या या नेत्यांच्या परिषदेत ब्रिटिश सरकार उलथून टाकण्याचा कट रचल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यांच्यावर भरलेला खटला 'मीरत कट खटला' म्हणून प्रसिद्ध आहे.

**चितगाव कट :** बंगालमधील चितगाव येथील शस्त्रागारावर हल्ला करण्याची योजना सूर्य सेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी आखली. ही योजना 'चितगाव कट' म्हणून ओळखली जाते. क्रांतिकारकांनी शस्त्रागारांवर हल्ला करून तेथील शस्त्रे लुटली. दळणवळण यंत्रणा बंद पाडली. या कटातील क्रांतिकारकांना अटक करण्यात आली. सूर्य सेन व त्यांच्या



सूर्य सेन

सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. कल्पना दत्त यांना जन्मठेप झाली. प्रीतिलता वड्डेदार यांनी पोलिसांच्या हाती न लागता आत्माहुती दिली.

बंगालमध्ये शांती घोष, सुनीती चौधरी आणि बीना दास यांचा सशस्त्र क्रांतिकार्यात सहभाग होता.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारी चळवळीने महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) महाराष्ट्रात १९०४ साली ………… येथे अभिनव भारत या गुप्त संघटनेची स्थापना झाली.
(पुणे, नाशिक, मुंबई, सातारा)

(आ) बंगालमध्ये ………… ही क्रांतिकारी संघटना कार्यरत होती.
(अभिनव भारत, अनुशीलन समिती, गदर संघटना, हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन)

(इ) बॅरिस्टर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ………… येथे इंडिया हाउसची स्थापना केली.
(लंडन, पॅरिस, स्टुटगार्ट, वॉशिंग्टन)

(ई) हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेच्या सेना विभागाचे प्रमुख ………… होते.
(सचिंद्रनाथ संन्याल, राजेंद्र लाहिरी, अशफाक-उल्ला-खान, चंद्रशेखर आझाद)

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वी ब्रिटिश सत्तेविरुद्ध महाराष्ट्रात सशस्त्र उठाव कोणी केले ?

(आ) स्वातंत्र्यवीर सावरकर यांना शिक्षा का झाली ?

(इ) सूर्य सेन व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणती योजना आखली ?

३. दोन ते तीन वाक्यांत माहिती लिहा.

(अ) अभिनव भारत

(आ) अनुशीलन समिती

(इ) हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन

४. उपक्रम :

भारतातील क्रांतिकारकांच्या चित्रांचा संग्रह करा आणि संबंधित चित्रांखाली संक्षिप्त माहिती लिहा.

□□□

**भगतसिंग**

भगतसिंग यांनी क्रांतीचा मार्ग स्वीकारला होता, परंतु त्यांना या मार्गाच्या मर्यादेची जाणीव होती. केवळ सशस्त्र क्रांतीने भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही, असे ते म्हणत. भगतसिंग यांना सामाजिक न्यायावर आधारलेला समाज भारतात निर्माण व्हावा असे वाटत होते.

# १४. 'चले जाव' आंदोलन


दुसरे महायुद्ध १९३९ साली सुरू झाले. ब्रिटिश सरकारने भारतीयांच्या इच्छेविरुद्ध भारताला इंग्लंडच्या बाजूने युद्धात गोवले. याचा धिक्कार करण्यासाठी राष्ट्रीय सभेने वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन सुरू केले. या आंदोलनात पहिले सत्याग्रही म्हणून आचार्य विनोबा भावे यांची निवड करण्यात आली. त्यानंतर अनेक सत्याग्रही आंदोलनात सहभागी झाले. युद्धासाठी भारतीयांचे संपूर्ण सहकार्य ब्रिटिशांना पाहिजे होते. भारतात राष्ट्रीय सरकारची स्थापना केल्याशिवाय अशा प्रकारचे संपूर्ण सहकार्य देण्याचे राष्ट्रीय सभेने नाकारले. ब्रिटिशांनी राष्ट्रीय सभेची ही मागणी धुडकावून लावली. त्यामुळे भारतात ब्रिटिशविरोधी वातावरण पसरले.



आचार्य विनोबा भावे

मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी झालेल्या अधिवेशनात 'चले जाव'चा ठराव मांडला. राष्ट्रीय सभेने ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढ्याचे रणशिंग फुंकले. या अधिवेशनात जनतेसमोर भाषण करताना 'करेंगे या मरेंगे' असा संदेश देऊन गांधीजी म्हणाले, की या क्षणापासून भारतीयांनी स्वतःला स्वतंत्र समजावे. स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एक तर आपण यश मिळवू अथवा हे प्रयत्न करत असताना बलिदान तरी देऊ. 'चले जाव'चा ठराव राष्ट्रीय सभेने प्रचंड बहुमताने मंजूर केला. गांधीजींच्या भाषणाने भारतीय जनता भारावून जाऊन स्वातंत्र्याच्या अखेरच्या लढ्यासाठी तयार झाली.

**'चले जाव' आंदोलन :** आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ते दडपून टाकण्यास सरकार सज्ज झाले. ९ ऑगस्टच्या पहाटे महात्मा गांधी, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादी प्रमुख नेत्यांना कारागृहात डांबण्यात आले. 'चले जाव' आंदोलनाची पाळेमुळे खणून काढण्यासाठी देशभर शेकडो कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. प्रमुख नेते गजाआड गेले, की आंदोलन सौम्य होईल, अशी सरकारची अपेक्षा होती, पण ती फोल ठरली.



मौलाना आझाद

प्रमुख नेत्यांना अटक केल्यामुळे देशभर सरकारविरुद्ध प्रखर जनआंदोलन सुरू झाले. सर्वत्र सभा घेण्यात आल्या, मोर्चे निघाले, हरताळ पुकारला गेला. निदर्शने करण्यात आली. ब्रिटिशांनी भारत सोडून चालते व्हावे, अशी सर्वत्र मागणी करण्यात आली.

या आंदोलनात महिला, विद्यार्थी, शेतकरी, दलित, आदिवासी, कामगार इत्यादींचा समावेश होता. नंदुरबार येथे शाळकरी मुलांनी तिरंगा घेऊन मिरवणूक काढली. 'चले जाव'च्या घोषणा दिल्या. मिरवणुकीवर झालेल्या गोळीबारात शिरीषकुमार, लालदास, धनसुखलाल, घनश्याम आणि शशीधर हे विद्यार्थी ठार झाले.

देशात ठिकठिकाणी पोलीस व जनता यांच्यात अक्षरशः रणकंदन सुरू झाले. शेतकरी आणि आदिवासी ब्रिटिशांना प्रखर विरोध करण्यास कचरले नाहीत. त्यांनी ग्रामीण भागातील काही ठिकाणच्या पोलीस कचेऱ्यांवर ताबा

मिळवला आणि तेथील शस्त्रे हस्तगत केली. याच काळात राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांच्या प्रेरणेने यावली, चिमूर, आष्टी येथे जनतेने प्रचंड आंदोलने केली.

शासकीय कार्यालये, शाळा-महाविद्यालये ओस पडली. शाळकरी मुलांमुलींनीही मिरवणुका काढल्या. त्यात 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' अशा घोषणा सर्वत्र निनादत होत्या. ब्रिटिश सरकारला राज्यकारभार करणे आता अशक्य झाले. सरकारने नेत्यांची धरपकड केली.

**भूमिगत चळवळ :** याच सुमारास काही नेत्यांनी भूमिगत राहून सरकारविरोधी चळवळ संघटित केली. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन, सुचेता कृपलानी, सानेगुरुजी, एस. एम.



जयप्रकाश नारायण उषा मेहता अरुणा असफअली

जोशी इत्यादींचा त्यांत समावेश होता. त्यांनी तरुणांची पथके उभारली. गुप्तपणे पत्रके छापणे, आकाशवाणी केंद्र चालवणे, दूरध्वनीच्या तारा कापणे इत्यादी कामे या पथकांनी केली. ही भूमिगत चळवळ अगदी खेडोपाडी पोहोचली.

मुंबई येथील भूमिगत आकाशवाणी केंद्र चालवण्याची जबाबदारी उषा मेहता यांनी घेतली. अरुणा असफअली यांनी भूमिगत राहून आंदोलनाचे नेतृत्व केले.

**प्रतिसरकार :** या काळात भारतात काही प्रांतांमध्ये आंदोलनाचा प्रभाव वाढत गेला. जनतेने तेथील कारभार आपल्या हाती घेतला. त्यांनी जमीन महसूल गोळा केला, पंचायत नेमून न्यायनिवाडा केला. जनतेची प्रतिसरकारे स्थापन केली. अशा प्रकारची प्रतिसरकारे बंगालमध्ये मिदनापूर, बिहारमध्ये पूर्णिया, महाराष्ट्रात सातारा येथे स्थापन झाली.


क्रांतिसिंह नाना पाटील

महाराष्ट्रात सातारा येथे स्थापन झालेले प्रतिसरकार वैशिष्ट्यपूर्ण ठरले. या प्रतिसरकारचे प्रेरणास्थान क्रांतिसिंह नाना पाटील हे होते. त्यांनी आपल्या भागातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना हुसकावून लावले आणि स्वतंत्र यंत्रणा उभारली.

या प्रतिसरकारांनी आपापल्या प्रांतांमध्ये एवढा दरारा निर्माण केला, की ब्रिटिश अधिकारी तिकडे जायला घाबरू लागले.

'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने भारतीयांनी आंदोलन निर्भयपणे चालवले. जनतेच्या मनातील ब्रिटिशांबद्दलची भीती नाहीशी झाली.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) मुंबई येथे ८ ऑगस्ट १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात ............ चा ठराव मांडला.

(आ) यावली, चिमूर, आष्टी येथे ............ यांच्या प्रेरणेने जनतेने प्रचंड आंदोलने केली.

(इ) अरुणा असफअली यांनी ………… राहून आंदोलनाचे नेतृत्व केले.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) पहिले वैयक्तिक सत्याग्रही | (१) अच्युतराव पटवर्धन |
| (आ) 'करेंगे या मरेंगे' हा संदेश | (२) क्रांतिसिंह नाना पाटील |
| (इ) प्रतिसरकारचे प्रेरणास्थान | (३) आचार्य विनोबा भावे |
| (ई) भूमिगत चळवळीत सहभाग | (४) शिरीषकुमार |
| | (५) महात्मा गांधी |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) भूमिगत चळवळीत उषा मेहता यांनी कोणती जबाबदारी घेतली ?

(आ) भारतात कोणत्या ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन करण्यात आली ?

४. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) राष्ट्रीय सभेने वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन का सुरू केले ?

(आ) भूमिगत चळवळीतील तरुणांच्या पथकांनी कोणती कामे केली ?

५. उपक्रम :

तुमच्या भागातील स्वातंत्र्यसैनिकांची माहिती मिळवा व हस्तलिखित तयार करा.



आंदोलनात स्त्रियांचा सहभाग

# १५. आझाद हिंद सेना

दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्लंडची आर्थिक स्थिती डबघाईला आली होती. तेथील जनताही युद्धाला त्रासली होती. त्यामुळे इंग्लंड अडचणीत आले होते. या परिस्थितीचा फायदा घेऊन राष्ट्रीय सभेने ब्रिटिशविरोधी सशस्त्र आंदोलन सुरू करावे, असा प्रचार सुभाषचंद्र बोस यांनी केला. त्यामुळे ब्रिटिश सरकार धास्तावून गेले. सरकारने सुभाषचंद्र बोस यांना अटक करून कारागृहात डांबले. तेथे त्यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे पुढे त्यांना कोलकत्यातील त्यांच्या घरी नजरकैदेत ठेवण्यात आले, तथापि सुभाषचंद्र बोस वेशांतर करून ब्रिटिशांच्या पहाऱ्यातून शिताफीने निसटले व जर्मनीची राजधानी बर्लिन येथे गेले.



नेताजी सुभाषचंद्र बोस

भारताच्या स्वातंत्र्यासाठी जर्मन सरकारची मदत मिळावी म्हणून सुभाषचंद्र बोस यांनी प्रयत्न केले. त्यांनी युरोपमधील भारतीय जनतेला संघटित करण्याचा प्रयत्न केला. बर्लिन येथे 'आझाद हिंद रेडिओ केंद्र' सुरू केले. या केंद्रावरून वेळोवेळी केलेल्या भाषणांत त्यांनी भारतीयांना स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र संघर्ष करण्याचे आवाहन केले.

**आझाद हिंद सेना :** भारतीय क्रांतिकारक रासबिहारी बोस हे त्या काळात जपानमध्ये राहत होते. जपानने सिंगापूर, मलेशिया, म्यानमार इत्यादी प्रदेश ब्रिटिशांकडून जिंकून घेतले होते. त्या प्रदेशांतील भारतीय

लोकांची एक संघटना बांधून रासबिहारी बोस यांनी 'हिंदी स्वातंत्र्य संघ' स्थापन केला होता. जपानच्या हाती पडलेल्या ब्रिटिश लष्करातील हिंदी सैनिकांची त्यांनी 'आझाद हिंद सेना' स्थापन केली. तिचे नेतृत्व करण्यासाठी त्यांनी सुभाषबाबूंना निमंत्रण पाठवले. सुभाषचंद्र बोस जर्मनीहून हजारो किलोमीटरचा खडतर सागरी प्रवास करून टोकियोला आले. त्यांनी तेथे आझाद हिंद सेनेचे नेतृत्व स्वीकारले.



रासबिहारी बोस

आझाद हिंद सेनेत त्यांनी 'झाशीची राणी' या नावाने स्त्रियांचे एक पथक स्थापन केले. या पथकाचे नेतृत्व डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन यांच्याकडे होते. या पथकात जानकी थिवी, बेला दत्त इत्यादी स्त्रिया सहभागी होत्या.



डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली 'आझाद हिंद सरकार' स्थापन झाले. या सरकारला जपान, जर्मनी, इटली इत्यादी राष्ट्रांनी मान्यता दिली. अंदमान व निकोबार बेटांचा ताबा घेऊन आझाद हिंद सरकारने तेथे तिरंगा फडकावला. अंदमानला 'शहीद' व निकोबारला 'स्वराज्य' अशी नावे दिली.

**चलो दिल्ली :** भारत स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सेनेने सिंगापूरहून आगेकूच केले. 'चलो दिल्ली' अशी घोषणा देत आझाद हिंद सेना भारताकडे निघाली. भारताच्या आराकान व कोहिमा या प्रदेशांत प्रवेश करताना ब्रिटिश लष्कराशी तिने निकराचा लढा दिला. पुढे मोहीम चालवणे अशक्य झाले. मुसळधार पाऊस सुरू झाला. जपानची मदत मिळणेही कठीण झाले. या अडचणींमुळे आझाद हिंद सेनेने माघार घेतली. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या विमानाला अपघात झाला आणि त्यात त्यांचे निधन झाले.

ब्रिटिशांच्या विरुद्ध लढत असताना आझाद हिंद सेनेचे अधिकारी पकडले गेले. लष्करी न्यायालयाने या अधिकाऱ्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली, पण ब्रिटिश सरकारच्या विरोधात तीव्र निदर्शने झाली. शेवटी जनतेचा प्रक्षोभ पाहून शिक्षा रद्द करण्यात आल्या.

**नौसैनिकांचा उठाव :** आझाद हिंद सेनेचा प्रभाव भारतीय नौसैनिकांवर व वायुसैनिकांवरही पडला. ब्रिटिशांची नोकरी करण्यापेक्षा आपणही मातृभूमीसाठी त्यांच्याविरुद्ध उठाव करावा, असे त्यांना वाटू लागले.

मुंबई बंदरात उभ्या असलेल्या 'तलवार' या युद्धनौकेवरील भारतीय नौसैनिकांनी १८ फेब्रुवारी १९४६ रोजी ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठाव केला. त्यांनी नौकेवरील 'युनियन जॅक' हा ब्रिटिशांचा ध्वज खाली उतरवला आणि तिरंगा फडकावला.

दिल्ली, लाहोर, अंबाला, मेरठ येथील वायुसैनिकही संपावर गेले. 'उठाव करणाऱ्या सैनिकांनी कामावर ताबडतोब परतावे, अन्यथा त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाईल,' असा आदेश सरकारनें काढला, परंतु त्याचा काहीही परिणाम झाला नाही. ब्रिटिशविरोधी उठाव चालूच राहिले. ठिकठिकाणी सामान्य जनतेचाही पाठिंबा त्यांना मिळाला.



नौसेनेचा उठाव

भारतीय लष्कर हा भारतातील ब्रिटिशांच्या सत्तेचा मुख्य पाया होता. तो पायाच आता खिळखिळा होऊ लागला. त्यामुळे भारतात आपली सत्ता फार काळ टिकणे अवघड आहे, याची जाणीव ब्रिटिशांना झाली.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) सुभाषचंद्र बोस वेशांतर करून ………… च्या पहाऱ्यातून शिताफीने निसटले.

(आ) जपानच्या हाती पडलेल्या ब्रिटिश लष्करातील हिंदी सैनिकांची 'आझाद हिंद सेना' ………… यांनी स्थापन केली.

(इ) आझाद हिंद सेना ………… घोषणा देत भारताकडे निघाली.

(ई) मुंबई बंदरात उभ्या असलेल्या ………… या युद्धनौकेवरील भारतीय नौसैनिकांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठाव केला.

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन यांनी आझाद हिंद सेनेतील कोणत्या पथकाचे नेतृत्व केले ?

(आ) आझाद हिंद सरकारला कोणकोणत्या राष्ट्रांनी मान्यता दिली ?

(इ) १८ फेब्रुवारी १९४६ रोजी 'तलवार' या युद्धनौकेवर कोणती घटना घडली ?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) आझाद हिंद सेनेने ब्रिटिश लष्कराविरुद्धच्या मोहिमेतून माघार का घेतली ?

(आ) आझाद हिंद सेनेच्या कार्याचा भारतीय नौसैनिकांवर कोणता परिणाम झाला ?

४. उपक्रम :

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे चरित्र वाचा.

**आझाद हिंद सेना**

- आझाद हिंद सेनेचे ब्रीदवाक्य होते - 'विश्वास-एकता-बलिदान'.
- युद्धघोषणा होती - 'चलो दिल्ली !'
- निशाण होते - चरख्याचे चित्र असलेला तिरंगी झेंडा.
- बोधचिन्ह होते - झेप घेणारा वाघ.
- मानवंदनेचा व अभिवादनाचा मंत्र होता - 'जय हिंद !'

# १६. भारत स्वतंत्र झाला

दुसरे महायुद्ध १९४५ साली समाप्त झाले. या युद्धात इंग्लंडला विजय मिळाला. त्यात इंग्लंडचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सुरू असलेला राष्ट्रव्यापी लढा, क्रांतिकारकांनी केलेल्या सशस्त्र चळवळी, आझाद हिंद सेनेने दिलेला सशस्त्र लढा या घटनांमुळे भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा होऊ लागला, म्हणून भारताचा कारभार भारतीयांच्या हाती सोपवण्याचे ब्रिटिशांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी भारतीय नेत्यांशी बोलणी सुरू केली.

१८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश संसदेने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा मंजूर केला. या कायद्याने भारताचे विभाजन होऊन भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण झाली.

१५ ऑगस्ट १९४७ हा भारताला स्वातंत्र्य देण्याचा दिवस ठरला. १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर दिल्ली येथे ब्रिटिशांचा 'युनियन जॅक' हा ध्वज खाली उतरवण्यात आला आणि त्या जागी स्वतंत्र भारताचा तिरंगी ध्वज फडकावण्यात आला. ब्रिटिशांच्या दास्यातून भारत स्वतंत्र झाला. लक्षावधी भारतीयांच्या असीम त्यागाची ही फलश्रुती होती. या ऐतिहासिक प्रसंगाच्या वेळी स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू आपल्या भाषणात म्हणाले, "अनेक वर्षांपूर्वी आपण नियतीशी एक करार केला होता. आज त्याची पूर्ती.... बऱ्याच अंशाने आपण करत आहोत. मध्यरात्रीच्या शांत वेळी सारे जग झोपले असताना भारत स्वातंत्र्याच्या नव्या युगात जन्म घेत आहे."

**संस्थानी प्रजेचा मुक्तिलढा :** भारत स्वतंत्र झाला, तरीही भारतीय जनतेचा स्वातंत्र्यलढा संपला नव्हता. ब्रिटिश राजवटीत अनेक लहानमोठी संस्थाने होती. काही संस्थानिक आपल्या प्रजेवर अन्याय, जुलूम करत



सरदार वल्लभभाई पटेल

असत. त्याविरुद्‌ध संस्थानी प्रजेने चळवळ सुरू केली होती. संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन व्हावीत, अशी संस्थानी प्रजेची इच्छा होती. स्वतंत्र भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची कणखर भूमिका व मुत्सद्‌देगिरी यांमुळे बहुतेक संस्थाने भारतात विलीन झाली. पाकिस्तानच्या फौजांनी काश्मीरमध्ये घुसखोरी करण्यास सुरुवात केली. त्या वेळी काश्मीर भारतात विलीन झाले. जुनागढच्या प्रजेने भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला.


**हैदराबाद मुक्तिलढा :** हैदराबाद हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. या संस्थानच्या संस्थानिकाला निजाम असे म्हणत. त्याने प्रजेवर अत्याचार केले. निजामाच्या अनियंत्रित राजवटीविरुद्‌ध प्रजेने प्रखर लढा दिला. या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ इत्यादींनी केले. 'हैदराबाद स्टेट काँग्रेस' या संघटनेच्या वतीने चळवळ सुरू करण्यात आली. त्यात शेकडो विद्यार्थी सहभागी झाले. आशाताई वाघमारे, सुशीलाबाई दिवाण, कावेरीबाई बोधनकर, सरस्वती बोरीकर इत्यादी स्त्रियांचाही या लढ्यात



स्वामी रामानंद तीर्थ

सहभाग होता. संस्थानी प्रजेने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे, अशी मागणी केली, परंतु निजाम आपले संस्थान स्वतंत्र ठेवावे, अशा विचाराचा होता. स्वतंत्र भारत सरकारला त्याने उद्दामपणे आव्हान दिले. त्या वेळी भारत सरकारने निजामाविरुद्ध पोलीस कारवाई केली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. संस्थानी प्रजेने दिलेला लढा यशस्वी झाला.

**फ्रेंच वसाहतींचे विलीनीकरण :** भारतातील ब्रिटिश सत्तेचा शेवट झाला, तरी भारताचे काही भाग अद्यापही विदेशी सत्तांच्या ताब्यात होते.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright. 1999.

चंद्रनगर, पाँडिचेरी, कारिकल, माहे, याणम या प्रदेशांवर फ्रान्सची सत्ता होती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फ्रेंच सरकारने भारत सरकारशी बोलणी केली व आपल्या ताब्यातील प्रदेश भारताच्या स्वाधीन केले.

**गोवा मुक्तिलढा :** गोवा, दीव व दमण, दादरा आणि नगर हवेली या प्रदेशांवर पोर्तुगिजांची सत्ता होती. तो प्रदेश मुक्त करण्यासाठी भारतीय जनतेला लढा द्यावा लागला. या लढ्यात डॉ. टी. बी. कुन्हा हे आघाडीवर होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील पोर्तुगीज सत्ता संपुष्टात आणण्यासाठी निकराचे प्रयत्न करण्यात आले. गोवा मुक्तिलढ्यात डॉ. राममनोहर लोहिया, नानासाहेब गोरे, हिरवेगुरुजी, सेनापती बापट, मधु लिमये, सुधीर फडके, मोहन रानडे, सुधाताई जोशी, सिंधुताई देशपांडे इत्यादी नेते आघाडीवर होते. महाराष्ट्रातून गोवा मुक्ती समितीच्या अनेक सत्याग्रहींची पथके गोव्यात शिरली. पोर्तुगिजांनी त्यांना दडपून टाकण्याचा प्रयत्न केला; परंतु सत्याग्रहींनी आपला लढा चालूच ठेवला. अखेरीस भारतीय लष्कराने १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगिजांच्या ताब्यातून मुक्त केला.



डॉ. टी. बी. कुन्हा

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा हा इतिहास अतिशय प्रेरणादायी आहे. हा संग्राम जुलूम व अन्यायाविरुद्ध होता. पाश्चात्त्य साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी होता. आपल्या स्वातंत्र्यलढ्याने जगातील अनेक देशांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. आपली मातृभूमी परकीयांच्या वर्चस्वापासून स्वतंत्र करण्यासाठी

अनेक देशबांधवांनी त्याग केला. स्वातंत्र्याचा, लोकशाहीचा आणि स्त्री-पुरुष समानतेचा अनमोल वारसा आपल्याला स्वातंत्र्यलढ्यातून मिळाला आहे. तो जतन करण्याची जबाबदारी आपल्या प्रत्येकाची आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) ब्रिटिश संसदेने भारतीय स्वातंत्र्याचा कायदा ………… रोजी मंजूर केला.

(आ) १७ सप्टेंबर १९४८ रोजी ……… संस्थान भारतात विलीन झाले.

(इ) चंद्रनगर, पाँडिचेरी, कारिकल, माहे, याणम या भागांवर ……… ची सत्ता होती.

(ई) गोवा, दीव व दमण, दादरा आणि नगर हवेली या भागांवर ………… ची सत्ता होती.

२. **'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्री | (१) स्वामी रामानंद तीर्थ |
| (आ) स्वतंत्र भारताचे गृहमंत्री | (२) डॉ. टी. बी. कुन्हा |
| (इ) हैदराबाद मुक्तिलढ्याचे नेतृत्व | (३) सरदार वल्लभभाई पटेल |
| (ई) गोवा मुक्तिलढ्याचे नेतृत्व | (४) पंडित जवाहरलाल नेहरू |
| | (५) आशाताई वाघमारे |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संस्थानी प्रजेने चळवळ का सुरू केली ?

(आ) बहुतेक संस्थाने भारतात का विलीन झाली ?

(इ) हैदराबाद मुक्तिलढ्यातील दोन स्त्रियांची नावे लिहा.

४. **तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) हैदराबाद मुक्तिलढा (आ) गोवा मुक्तिलढा

५. **उपक्रम :**

शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात देशभक्तीपर गीते सादर करा.

# नागरिकशास्त्र

# १७. आपला देश

'भारत माझा देश आहे,' असे आपण म्हणतो. ज्या ठिकाणी आपण जन्मतो, खेळतो, बागडतो आणि मोठे होतो, तो परिसर म्हणजे आपल्या देशाचा एक भाग असतो. या परिसराशी आपले एक वेगळेच नाते असते. आपल्या आजूबाजूस राहणाऱ्या लोकांबद्दल आपणांस आपुलकी वाटते. तेच आपले शेजारी, सोबती आणि मित्र होतात. आपण राहतो त्या गावाचा आपल्याला अभिमान असतो. अशी अनेक खेडी, गावे आणि शहरे या सर्वांचा मिळून देश बनतो. आपला देशही अशीच लाखो खेडी आणि शहरे यांनी बनलेला आहे.

देशाला काही निश्चित सीमारेषा असते. या सीमारेषेच्या आत राहणारे त्या देशाचे रहिवासी असतात. भारताच्या सीमारेषेत राहणारे आपण सर्व 'भारतीय' म्हणून ओळखले जातो.

देशात राहणाऱ्या लोकांमध्ये आपण एक आहोत, अशी भावना रुजू लागते. भाषा, संस्कृती, इतिहास इत्यादींमुळे ती बळकट होते. या ऐक्यभावनेमुळे आपला देश केवळ एक देश न राहता त्याचे राष्ट्र बनते. राष्ट्राविषयी अभिमान वाटू लागतो. राष्ट्राला स्थैर्य प्राप्त होते, विकासाला चालना मिळते. देशावर येणाऱ्या कोणत्याही संकटाला आपण यशस्वीपणे तोंड देऊ शकतो.

**राष्ट्रीय सण :** आपल्यातील एकोपा टिकून राहावा व जोपासला जावा, म्हणून आपण राष्ट्रीय सण उत्साहाने साजरे करतो. 'स्वातंत्र्यदिन' आणि 'प्रजासत्ताक दिन' हे आपले राष्ट्रीय सण आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. हा दिवस दरवर्षी आपण स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करतो. या दिवशी झेंडावंदनाचा

कार्यक्रम देशभर साजरा केला जातो. झेंडावंदनाच्या कार्यक्रमाला नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहिले पाहिजे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्याग केलेल्या व्यक्तींचे स्मरण आपण या दिवशी करतो.

२६ जानेवारी हा दिवस आपण दरवर्षी प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. आपला राज्यकारभार लोकशाही पद्धतीने करण्यास २६ जानेवारी १९५० पासून सुरुवात झाली. प्रजासत्ताक दिनाचे एक वेगळेच महत्त्व आहे. अतिशय प्रेक्षणीय असे संचलन, हे प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे एक वैशिष्ट्य आहे. या संचलनात भूदल, नौदल आणि हवाईदल ही देशाची तीन संरक्षण दले सहभागी होतात. विविध राज्यांतील काही विद्यार्थी आणि राष्ट्रीय छात्रसेनेचे निवडक विद्यार्थी या संचलनात भाग घेतात. या कार्यक्रमास आपण अन्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांस आमंत्रित करतो. ज्या मुलामुलींना शौर्यपदके मिळाली आहेत, ते या संचलनात सहभागी होतात. या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती स्वीकारतात. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन प्रजासत्ताक दिनी केले जाते. अशाच प्रकारचे कार्यक्रम प्रत्येक राज्यात व जिल्ह्यात आयोजित केले जातात.

**राष्ट्रीय प्रतीके :** राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राजमुद्रा ही आपली राष्ट्रीय प्रतीके आहेत. राष्ट्राबद्दलचे प्रेम प्रतीकांमधून व्यक्त होते. तसेच प्रतीकांमुळे ऐक्यभावना बळकट होते.

**राष्ट्रध्वज :** आपल्या राष्ट्रध्वजात तीन रंग आहेत. यांतील प्रत्येक रंग आपल्याला एक निश्चित संदेश देतो. सर्वांत वरच्या बाजूस असणारा केशरी रंग त्याग व शौर्याचे प्रतीक आहे. शांतीचा संदेश मध्यभागी असणाऱ्या पांढऱ्या रंगातून मिळतो. खालच्या बाजूस असलेला हिरवा रंग

समृद्धीचे प्रतीक आहे. राष्ट्रध्वजाच्या मध्यभागी असणाऱ्या पांढऱ्या पट्ट्यावर निळ्या रंगाचे अशोक चक्र आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. यातून आपण देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असले पाहिजे असा संदेश मिळतो.

**राष्ट्रगीत :** 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे. हे गीत रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिले. त्यात भारतातील विविध प्रदेश, नद्या व पर्वत यांचे वर्णन केले आहे. राष्ट्रगीताचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे. राष्ट्रगीताचा अनादर होणार नाही, याची आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रगीत सुरू असताना आपण सावधान स्थितीत उभे राहावे.

**राजमुद्रा :** प्रत्येक देशाची स्वतःची अशी एक निशाणी असते. तिला राजमुद्रा असे म्हणतात. सर्व नाणी, नोटा, शासकीय पत्रे इत्यादींवर ही राजमुद्रा असते. सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे भारताची राजमुद्रा तयार करण्यात आली. राजमुद्रेतील सिंहाच्या चित्राखाली 'सत्यमेव जयते' हे वचन आहे.



राजमुद्रा

आपले राष्ट्रीय सण आपण आनंदाने साजरे केले पाहिजेत. त्यातून एकात्मतेची भावना वाढीस लागते. राष्ट्रीय प्रतीकांमुळे ती आणखी दृढ होते. भारतीयांमधील ऐक्यभावना देशाच्या प्रगतीला आवश्यक आहे.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) भारताच्या सीमारेषेत राहणारे आपण सर्व ………… म्हणून ओळखले जातो.

(आ) स्वातंत्र्यदिन आणि ………… हे आपले राष्ट्रीय सण आहेत.

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून का साजरा करतो ?

(आ) राष्ट्रध्वजातील केशरी रंग कशाचे प्रतीक आहे ?

(इ) राष्ट्रगीत सुरू असताना कोणती काळजी घ्यावी ?

(ई) राजमुद्रेखाली कोणते वचन आहे ?

३. दोन ते तीन वाक्यांत माहिती लिहा.

(अ) राष्ट्रध्वज (आ) राष्ट्रगीत (इ) राजमुद्रा

४. उपक्रम :

आपल्या देशाची राजमुद्रा आपणांस कोणत्या वस्तूंवर आढळते, त्यांची यादी तयार करा.

❑❑❑

**राष्ट्रध्वजाचा आदर राखण्यासाठी हे लक्षात ठेवा.**

- राष्ट्रध्वज लावताना त्याचा केशरी रंगाचा आडवा पट्टा वरच्या बाजूस असावा.
- राष्ट्रध्वज स्वच्छ आणि नीटनेटका असावा.
- राष्ट्रध्वज चुरगळलेला आणि फाटलेला नसावा.
- राष्ट्रध्वज ध्वजस्तंभाच्या वरच्या टोकालाच फडकवत ठेवावा. (राष्ट्रीय दुखवट्याच्या काळात राष्ट्रध्वज ध्वजस्तंभाच्या अर्ध्यावर उतरवतात.)
- राष्ट्रध्वज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत फडकवत ठेवावा.
- सूर्यास्ताच्या वेळी राष्ट्रध्वज आदरपूर्वक उतरवावा.
- राष्ट्रध्वज चढवताना व उतरवताना सर्वांनी 'सावधान' स्थितीत उभे राहावे.



**सारनाथ स्तंभशीर्ष**

भारताची राजमुद्रा सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे तयार करण्यात आली आहे. सारनाथ येथील मूळ स्तंभावर चार सिंह आहेत. एकमेकांकडे पाठ करून ते उभे आहेत. आपण एकाच बाजूने पाहत असल्याने राजमुद्रेवर तीनच सिंह दिसतात. प्रत्येक सिंहाच्या प्रतिमेखाली आडव्या पट्टीवर चक्र आहे. त्यांपैकी आपणांस एकच चक्र पूर्णपणे दिसते. चक्राच्या एका बाजूस घोडा व दुसऱ्या बाजूस बैल आहे. राष्ट्रध्वजाप्रमाणे राजमुद्रेतूनही आपणांस संदेश मिळतो. राजमुद्रेतील सिंह हे सामर्थ्याचे प्रतीक आहे. चक्रातून गती व्यक्त होते. घोडा हा प्राणी उत्साह आणि वेग यांचे महत्त्व दर्शवतो. आपण कामसू आणि खंबीर असले पाहिजे, हा संदेश राजमुद्रेतील बैलाचे चित्र देते.

# १८. आपली लोकशाही

दरवर्षी तुम्ही आपल्या वर्गाचा प्रतिनिधी निवडता. तुमच्यापैकी काही विद्यार्थी-विद्यार्थिनी वर्गप्रतिनिधी होण्यास उत्सुक असतात. ते निवडणुकीस उभे राहतात. एका नियोजित दिवशी तुमच्या पसंतीच्या विद्यार्थ्याला तुम्ही मतदान करता. ज्या विद्यार्थ्याला जास्त मते पडली आहेत, असा विद्यार्थी वर्गप्रतिनिधी म्हणून निवडून येतो. त्याच्यावर अनेक जबाबदाऱ्या असतात. त्याने वर्गात शांतता राखली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मागण्या व त्यांच्या अडीअडचणी, त्यांना हव्या असणाऱ्या सुधारणा यांची माहिती त्याने शिक्षकांपर्यंत पोचवली पाहिजे. आपल्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडास्पर्धा व अन्य उपक्रमांचे आयोजन हे वर्गप्रतिनिधीचे काम असते. हे काम समाधानकारक न करणाऱ्या वर्गप्रतिनिधीला जाब विचारण्याचा अधिकार तुम्हांला असतो. वर्गाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. याच पद्धतीने आपल्या गावांचा, शहरांचा व देशाचा राज्यकारभार केला जातो.

**लोकशाहीचा अर्थ :** लोकशाही ही राज्यकारभार करण्याची एक पद्धती आहे. लोकांनी निवडलेले प्रतिनिधी लोककल्याणासाठी राज्य चालवतात. याला लोकशाही असे म्हणतात. निवडणुकांच्या वेळी लोक मतदान करतात व आपले प्रतिनिधी निवडतात. लोकांच्या वतीने प्रतिनिधी कायदे करतात. विकासाच्या नव्या योजना आखतात. एखादा प्रतिनिधी आपले काम योग्य प्रकारे करत नाही, असे वाटल्यास पुढील निवडणुकीत लोक अन्य व्यक्तीला निवडून देतात. लोकशाहीत लोकांचा राज्यकारभारात असा सहभाग असतो.

**स्वातंत्र्य आणि समता :** लोकशाहीत लोकांच्या स्वातंत्र्याला महत्त्व असते. त्यांना बोलण्याचे व हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य असते. कोणत्याही धर्माच्या पालनाचे स्वातंत्र्य असते. आपण आपल्या इच्छेनुसार

व्यवसाय, व्यापार निवडू शकतो. आपण मोठेपणी कोण होणार हे ठरवण्याचे आपल्याला स्वातंत्र्य असते व त्यासाठी प्रयत्न करण्याची मोकळीक असते.



स्वातंत्र्य आणि समता

लोकशाहीत सर्व माणसे समान मानली जातात. जात किंवा धर्म यांवर आधारलेला भेद केला जात नाही. स्त्री व पुरुष असा भेद न करता सर्वांना प्रगतीची संधी दिली जाते.

**आपल्या लोकशाहीचे स्वरूप :** आपल्या देशात लोकशाही पद्धतीने राज्यकारभार चालवला जातो. आपली लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. आपल्या देशात दर पाच वर्षांनंतर सार्वत्रिक निवडणुका होतात आणि नवे शासन अस्तित्वात येते. या निवडणुका व्यवस्थितपणे पार पाडण्याचे काम निवडणूक आयोग करतो. वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार आहे. कोणत्या

मतदाराने कोणाला मत दिले, हे कोणालाही समजत नाही, म्हणजेच निवडणुकीत गुप्त मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यामुळे मतदारांना कोणाचीही भीती न बाळगता मतदान करता येते.

वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दूरदर्शन इत्यादी माध्यमांद्वारे लोकांना राज्यकारभाराविषयी माहिती मिळते. त्याआधारे आपले शासन जनतेच्या हिताचे रक्षण करत आहे की नाही, हे लोक जाणून घेतात. आपल्या तक्रारी आणि सूचना शासनापर्यंत त्यांना पोचवता येतात. लोकांना शासनाच्या कारभाराविषयी माहिती मिळवता येते.

**आपला सहभाग :** आपल्या विकासासाठी लोकशाही आवश्यक आहे. लोकशाही टिकवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. लोकशाही अधिक दृढ होण्यासाठी आपला सहभाग महत्त्वाचा आहे. त्याची सुरुवात आपण आपल्यासाठी असणाऱ्या नियमांच्या पालनाने केली पाहिजे. आपण



कुटुंबातील चर्चा

शाळेच्या उपक्रमांमध्ये सहभागी झाले पाहिजे. विविध स्पर्धांमध्ये शाळेचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. ग्रंथालय व प्रयोगशाळा, संगणक कक्ष, इंटरनेट इत्यादी सुविधा जबाबदारीने वापरल्या पाहिजेत. यातूनच लोकशाहीला आवश्यक असणारी सहभागाची वृत्ती वाढीस लागते.

कुटुंबातील व्यवहारांतही आपला सहभाग असावा. कुटुंबातील सर्व व्यक्तींचा आदर करावा. सर्वांशी बोलून निर्णय घ्यावेत. कुटुंबातल्या कामांत आपला वाटा उचलावा. कोणतेही काम कमी प्रतीचे न मानता ते सर्वांनी करण्याचा आग्रह धरावा. कोणताही प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावा. आपली नापसंतीसुद्धा शांततेच्या मार्गाने व्यक्त करावी.

भांडणतंटे, दंगेधोपे यांमुळे लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो. आपापसातील समंजसपणा आणि सहिष्णुता यांमुळे लोकशाहीची जोपासना होते. लोकशाहीच्या रक्षणासाठी आपण जागरूक असले पाहिजे.

लोकशाही पद्धतीत स्वातंत्र्य व समता या मूल्यांना महत्त्व आहे. अन्याय, अत्याचाराविरुद्ध दाद मागता येते. त्यासाठी लोकचळवळ उभी करता येते. लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न करता येतात, म्हणूनच जनतेच्या संमती व सहभागावर आधारलेली लोकशाही शासनपद्धती ही राज्यकारभाराची आदर्श पद्धती आहे.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) लोकशाहीत आपल्याला बोलण्याचे व हिंडण्याफिरण्याचे ............ असते.

(आ) आपल्या देशात ............ पद्धतीने राज्यकारभार चालवला जातो.

(इ) निवडणुका व्यवस्थितपणे पार पाडण्याचे काम ............... आयोग करतो.

(ई) भारतात वयाची ......... वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार आहे.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लोकशाही म्हणजे काय ?

(आ) लोकशाहीत मतदानासाठी कोणती पद्धत वापरतात ?

(इ) लोकशाही पद्धतीत कोणत्या मूल्यांना महत्त्व आहे ?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लोकशाहीत लोकांना कोणकोणत्या प्रकारचे स्वातंत्र्य असते ?

(आ) कुटुंबातील व्यवहारात लोकशाहीचा अवलंब कशाप्रकारे करता येतो ?

**४. उपक्रम :**

खालील मुद्द्यांच्या आधारे वर्गाचा प्रतिनिधी निवडण्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक आयोजित करा.

(१) निवडणुकीचा दिवस ठरवणे

(२) उमेदवारांकडून अर्ज मागवणे

(३) अर्जांची तपासणी करणे

(४) मतदान घेणे

(५) मतमोजणी करणे

(६) निर्णय जाहीर करणे


# १९. आपले संविधान

आपल्या देशाचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो. असा कारभार करताना तो कायद्यानुसार केला जावा, यासाठी देशाला संविधानाची गरज असते.

**भारताचे संविधान :** आपल्या देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले मूलभूत कायदे ज्या ग्रंथात एकत्रित आहेत, त्यास 'भारताचे संविधान' असे म्हणतात. संविधानास राज्यघटना असेही म्हणतात. त्यातील तरतुदी लिखित स्वरूपात आहेत. या तरतुदींच्या आधारे आपले लोकप्रतिनिधी राज्यकारभार करतात.




डॉ. राजेंद्रप्रसाद



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**संविधान सभा :** आपल्या देशाचे संविधान तयार करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीला 'संविधान सभा' असे म्हटले जाते.

डॉ. राजेंद्रप्रसाद संविधान सभेचे अध्यक्ष होते. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते.



**भारतीय संविधानाचा मसुदा संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
**(विजय सुरवाडे यांच्या संग्रहातून–लोकवाङ्मय गृह, मुंबई यांच्या सौजन्याने)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अहोरात्र अभ्यास व चिंतन करून संविधानाचा मसुदा तयार केला. त्यामुळे त्यांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' असे म्हणतात.

संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारले. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात १९३० पासून दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा केला जात होता. त्या दिवसाची आठवण म्हणून आपल्या संविधानाची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू करण्यात आली. हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो.

भारतीय संविधानात नागरिकांचे हक्क स्पष्ट केले आहेत. त्याचप्रमाणे नागरिकांची कर्तव्ये सांगितली आहेत. सर्व भारतीयांनी संविधानाचा आदर केला पाहिजे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संविधान सभेचे अध्यक्ष ............... हे होते.

(आ) २६ जानेवारी हा दिवस आपण .............. म्हणून साजरा करतो.


२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संविधान म्हणजे काय ?

(आ) भारतीय संविधानाचे शिल्पकार कोणाला म्हणतात ?

३. **उपक्रम :**

ग्रंथालयातून भारतीय संविधानाची प्रत मिळवा व तिचे अवलोकन करा.



संविधान सभेतील कामकाजाचे एक दृश्य

**भारताची संविधान सभा**

(१) संविधान सभेत एकूण २९९ सदस्य होते.

(२) ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली व कामकाज सुरू झाले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेचे कामकाज पूर्ण झाले.

(३) संविधान सभेची एकूण ११ अधिवेशने भरली. प्रत्यक्ष कामकाज १६५ दिवस चालले.

(४) संविधान सभेत चर्चा व विचारविनिमयाच्या आधारे निर्णय घेण्यात आले. विरोधी मतांचा आदर व त्यांच्या योग्य सूचनांचा स्वीकार हे तेथील कामकाजाचे वैशिष्ट्य होते.


# २०. आपला राज्यकारभार

देशाचा राज्यकारभार कोणत्या पद्धतीचा असावा, हे संविधानातील तरतुदी स्पष्ट करतात. भारतीय संविधानात राज्यकारभाराच्या पद्धतीची माहिती दिली आहे. आपण लोकशाही व्यवस्था स्वीकारली आहे. आपल्या देशातील लोकशाही ही संसदीय लोकशाही म्हणून ओळखली जाते.

**संसदीय पद्धती :** संसद म्हणजे लोकांनी देशाच्या राज्यकारभारासाठी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे कायदेमंडळ होय. प्रतिनिधी कायदे तयार करण्याचे काम करतात. या प्रतिनिधींमधून काही प्रतिनिधी मंत्री म्हणून निवडले जातात. अनेक मंत्र्यांचे मिळून मंत्रिमंडळ बनते. मंत्रिमंडळाचा प्रमुख प्रधानमंत्री असतो. लोकप्रतिनिधी मंत्रिमंडळाला कारभाराविषयी प्रश्न विचारू शकतात. त्यांची समाधानकारक उत्तरे देणे त्यांना बंधनकारक असते. ही संसदीय लोकशाही पद्धतीची वैशिष्ट्ये आहेत.

**संघराज्य पद्धती :** आपल्या देशाचा राज्यकारभार करणाऱ्या शासनाला 'संघशासन' (केंद्रशासन) असे म्हणतात. राज्यकारभाराच्या सोईसाठी संपूर्ण देशाचे काही भाग पाडले आहेत. त्यांना घटक राज्ये म्हणतात. घटक राज्य पातळीवरील शासनव्यवस्थेला 'राज्यशासन' असे म्हणतात. संघशासन व राज्यशासन या दोन पातळ्यांवरील शासनव्यवस्थेला मिळून 'संघराज्य पद्धती' असे म्हणतात.

संघराज्य पद्धतीमध्ये संघशासन आणि घटक राज्यांचे शासन यांच्यामध्ये राज्यकारभाराच्या कामांच्या विषयांची वाटणी केलेली असते. आपल्या देशाचे संरक्षण करणे, परदेशांशी व्यवहार आणि देवाणघेवाण करणे, रेल्वेची व्यवस्था पाहणे यांसारखी संपूर्ण देशाच्या दृष्टीने महत्त्वाची कामे संघशासन पाहते. आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था राखणे, आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देणे यांसारखी कामे राज्यशासन करते.




The territorial waters of India extends into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright 2006.

भारताच्या संघराज्यात अठ्ठावीस घटक राज्ये आणि संघशासनाच्या नियंत्रणाखाली सात प्रदेश आहेत.

भारतीय संघराज्यातील संघशासन, सर्व घटक राज्ये व संघशासित प्रदेश यांमध्ये ऐक्य व सहकार्य असले पाहिजे. त्यामुळे देशाचे सामर्थ्य वाढेल.

**स्थानिक कारभार :** आतापर्यंत आपण आपल्या देशाचा आणि घटक राज्यांचा राज्यकारभार कसा चालतो, हे पाहिले. आपण राहतो त्या गावाचा किंवा शहराचा कारभार कसा चालतो, हे आता आपण पाहू.

गावाचा कारभार ग्रामपंचायतीमार्फत केला जातो. ग्रामपंचायतीत त्या गावातील लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. तालुका पातळीवर लोककल्याणाची व विकासाची कामे करण्यासाठी पंचायत समिती असते. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद असते. तेथील लोकांच्या विकासासाठी असणाऱ्या योजना जिल्हा परिषद राबवते.

आपल्या गावात पाणी, रस्ते, दिवाबत्ती, शिक्षण, मनोरंजन, आरोग्य सेवा इत्यादी सोईसुविधा आपणांस मिळतात. त्या पुरवण्याचे काम स्थानिक पातळीवरील स्थानिक शासन संस्था करतात.

स्थानिक शासन संस्थांमध्ये लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. ते आपल्या संस्थेचा कारभार पाहतात. दर पाच वर्षांनी निवडणुका घेतल्या जातात.

मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यांसारख्या मोठ्या शहरांचा कारभार महानगरपालिकेकडे असतो. लोकसंख्येने व आकाराने लहान असणाऱ्या शहराचा कारभार नगरपरिषद पाहते. लष्कराची छावणी असणाऱ्या ठिकाणी कटक मंडळ ही स्थानिक शासन संस्था काम पाहते.

स्थानिक पातळीवर कारभार करणाऱ्या या संस्था आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असतात. त्या आपल्या सर्वांत निकटच्या शासनसंस्था आहेत. आपल्या सहभागावर त्या अवलंबून असतात. आपला सहभाग आणि सहकार्य असेल तरच त्या उत्तम प्रकारे काम करू शकतील. पाणीपुरवठा, आरोग्यविषयक योजना, पर्यावरण रक्षण व कचऱ्याची विल्हेवाट इत्यादींबाबत या संस्था जे नियम करतात, त्यांचे आपण पालन केले पाहिजे.



आरोग्यविषयक योजना

स्थानिक शासन संस्था आणि नागरिक यांच्यातील देवाणघेवाणीतून अनेक गुण आत्मसात करता येतात. स्वयंशिस्त, जबाबदारीची व सहभागाची जाणीव, सहकार्य भावना इत्यादी लोकशाहीसाठी आवश्यक गुणांची जोपासना स्थानिक शासन संस्थांमुळे होते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) संपूर्ण देशाच्या दृष्टीने महत्त्वाची कामे ............ पाहते.
(राज्यशासन, संघशासन, कटक मंडळ, महानगरपालिका)

(आ) जिल्हा पातळीवर ............ असते.
(पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, नगरपरिषद)

(इ) लोकसंख्येने व आकाराने लहान असणाऱ्या शहराचा कारभार ............ पाहते.
(राज्यशासन, महानगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत)

२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) संसद म्हणजे काय ?

(आ) पंचायत समिती कोणते काम करते ?

(इ) कटक मंडळ ही संस्था कोणत्या ठिकाणी काम पाहते ?

३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) संघशासनाची प्रमुख कामे कोणती ?

(आ) स्थानिक शासन संस्थांमुळे कोणत्या गुणांची जोपासना होते ?

४. उपक्रम :

तुमच्या भागात असणाऱ्या स्थानिक शासन संस्थेस भेट द्या. ही संस्था कोणती कामे करते, त्याची माहिती मिळवा.

# २१. आपली कर्तव्ये


आपण समाजाचे घटक आहोत. आपले आईवडील, आजी, आजोबा, नातेवाईक आणि शेजारी यांच्या सहवासात आपण वाढतो. समाजातील सर्वांचे जीवन परस्परांवर अवलंबून असते. एकमेकांच्या सहकार्याने आपला विकास होतो, म्हणून समाजाला आणि देशाला प्रगती करता येते. या प्रगतीत आपल्याला आपला वाटा उचलता आला पाहिजे. त्यासाठी आपण काही कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. सर्वांचे जीवन सुखी व आनंददायी व्हावे म्हणून प्रत्येकाने चांगले वागले पाहिजे. इतरांशी वागताना आपण ज्या चांगल्या सवयींचा अवलंब करतो, त्याला कर्तव्यांचे पालन असे म्हणता येईल.

**वैयक्तिक कर्तव्ये :** आपण आपला बराच वेळ कुटुंब, शेजारी, मित्रमैत्रिणी यांच्या सहवासात घालवतो. खेळ, अभ्यास, स्पर्धा, मनोरंजन, प्रवास, सण, उत्सव अशा अनेक प्रसंगांमध्ये एकत्र येतो. या प्रसंगांमध्ये आपण जर समंजसपणे वागलो, तर आपणां सर्वांना त्यातून आनंद लुटता येतो. याची सुरुवात आपल्यापासून करता येईल. आपण स्वच्छ राहिले पाहिजे. प्रसन्न दिसले पाहिजे. त्यासाठी आपल्याला चांगल्या आरोग्यविषयक सवयी असणे आवश्यक आहे. समतोल आहार घेऊन आपल्याला आजारांना दूर ठेवता येते. व्यायाम केल्याने शरीर निरोगी राहते. निकोप आरोग्यामुळे आपल्याला शाळेच्या सर्व उपक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेता येतो.

आपले घर स्वच्छ आणि नीटनेटके असले पाहिजे. घरात निर्माण होणारा कचरा रस्त्यावर फेकू नये. तो नदी-नाल्यांत टाकू नये. ओला व सुका कचरा वेगवेगळा साठवावा आणि त्याची योग्य विल्हेवाट लावावी.

घरातील लोकांशी आदराने व प्रेमाने वागावे. वृद्ध व अपंग व्यक्तींकडे विशेष लक्ष द्यावे. त्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. घराबाहेरचा परिसरही स्वच्छ ठेवावा. त्यासाठी परिसरातील लोकांनी एकत्र यावे. एकमेकांना मदत करावी आणि परिसर सुंदर बनवण्याचा प्रयत्न करावा.

**सामाजिक कर्तव्ये :** दिवसाचा बराचसा वेळ आपण शाळेत घालवतो. घराप्रमाणेच शाळेबद्दलही आपल्याला आपुलकी असते. शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आपला पुढाकार असला पाहिजे. शिक्षकांचा आदर करणे, हे आपले कर्तव्य आहे. त्यांनी सांगितलेला अभ्यास व अभ्यासपूरक उपक्रम आपण उत्साहाने पूर्ण करावेत. उपक्रम पूर्ण केल्यानंतर शिक्षकांनी दिलेली शाबासकी प्रोत्साहन देणारी ठरते.



ध्वनी प्रदूषण

आजारी मित्राची विचारपूस करणे, हे आपले कर्तव्य आहे. अशी विचारपूस केल्याने त्याला दिलासा मिळेल, त्याची उमेद वाढेल.

घरातील व घराबाहेरील प्राणी, पक्षी हेसुद्धा आपल्या आनंदात भर घालत असतात. त्यांना उपद्रव होणार नाही याची काळजी घ्यावी.

सण व उत्सव साजरे करताना आपण काही पथ्ये पाळली पाहिजेत. ध्वनी प्रदूषण होईल इतक्या मोठ्यां आवाजात गाणी लावू नयेत. याबाबत जे नियम स्पष्ट केले जातात, त्यांचे पालन करावे. एरवीही घरात रेडिओ व दूरदर्शन मोठ्या आवाजात लावू नये.

आपल्या गावातील अथवा शहरातील पाणीसाठे, नदी, नाले दूषित होणार नाहीत याची काळजी घ्यावी. पाण्याचा वापर काटकसरीने करावा.

**ग्राहकांची कर्तव्ये :** आपण अनेक वस्तू बाजारातून विकत आणतो. घरी वस्तू आणल्यानंतर आपल्या लक्षात येते, की एखाद्या वस्तूचे वजन दुकानदाराने योग्य केले नाही. काही वेळेस कमी प्रतीच्या वस्तू आपल्याला दिल्या जातात. मुदत संपलेली औषधेही आपल्या घरी आली आहेत, हे लक्षात येते. अशा प्रकारच्या व्यवहारात आपली फसवणूक झालेली असते. ही फसवणूक होऊ नये म्हणून आपण वस्तू विकत घेताना काळजी घेणे आवश्यक आहे.

वस्तू विकत घेताना आपण ग्राहक असतो. ग्राहक म्हणून आपले काही हक्क असतात. वस्तूची किंमत योग्य आहे का, हे आपण पाहिले पाहिजे. खराब माल कधीही विकत घेऊ नये. बंद आवरणातील खाद्यपदार्थ घेताना त्यावरील सर्व तारखा तपासल्या पाहिजेत. पदार्थ तयार केल्याची व तो कोणत्या मुदतीच्या आत वापरायचा आहे याची माहिती करून घेतल्यानंतर त्या वस्तूची खरेदी करावी. खरेदी केलेल्या सर्व वस्तूंची पावती मागावी. ही दक्षता घेतली तरच समाजातील फसवणुकीसारख्या वाईट प्रवृत्ती आपल्याला रोखता येतील.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) समाजातील सर्वांचे जीवन ............ वर अवलंबून असते.

(आ) घरात निर्माण होणारा ............ रस्त्यावर फेकू नये.

(इ) वस्तू विकत घेताना आपण ............ असतो.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) व्यायाम केल्याने कोणता फायदा होतो ?

(आ) ध्वनी प्रदूषण होणार नाही यासाठी आपण कोणती काळजी घ्यावी ?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) आपली वैयक्तिक कर्तव्ये कोणती ?

(आ) वस्तू खरेदी करताना कोणती दक्षता घ्यावी ?

४. **उपक्रम :**

वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या ग्राहक संरक्षणविषयक जाहिराती जमवा. त्या एका वहीत चिकटवून संग्रह तयार करा.


### गुणवत्तादर्शक प्रमाणचिन्हे

**आय.एस.आय.**

विजेची उपकरणे, प्रेशर कुकर, गॅसची शेगडी, प्रवासी गाडीचे टायर, स्वच्छतागृहातील साबण, शिरस्त्राण (हेल्मेट) इत्यादींवरील प्रमाणचिन्ह.


**ॲगमार्क**

धान्ये, डाळी, खाद्यतेल, तूप, लोणी, मध, मसाले, चहा पावडर इत्यादी खाद्यपदार्थांचे डबे व बंद आवरणावरील शुद्धतेचे प्रमाणचिन्ह.



"जगातील सर्व देशांप्रमाणेच स्वातंत्र्य उपभोगणे आणि स्वकष्टाने जीवनाच्या गरजा पूर्ण करून, सर्वांगीण विकासाची संधी प्राप्त करून घेणे, हे भारतीय जनतेचे मूलभूत हक्क आहेत. सरकार जर लोकांना हे हक्क नाकारीत असेल आणि त्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती करीत असेल, तर ते सरकार बदलण्याचा आणि रद्द करण्याचा अधिकार येथील जनतेला आहे. ब्रिटिश सरकारने भारताच्या स्वातंत्र्याचे अपहरण केले, इतकेच नव्हे, तर येथील जनतेचे शोषण करून भारताचे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवन उद्ध्वस्त केले आहे, म्हणून भारताने ब्रिटिश साम्राज्याशी असलेला संबंध तोडून टाकून संपूर्ण स्वराज्याचे ध्येय साध्य केले पाहिजे अशी आमची ठाम भूमिका आहे."

२६ जानेवारी, १९३०



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

रु. १३.००